७० वर्ष

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## सरकारचे अपयश, जनतेचे मुद्दे घेऊन रस्त्यावर उतरा

पुणे (दै. संध्या) : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश पदाधिकारी व जिल्हाध्यक्षांची संयुक्त बैठक टिळक भवन येथे संपन्न झाली. या बैठकीला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्यासह काँग्रेसचे अन्य पदाधिकारी, नेते उपस्थित होते. ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विधान परिषदेतील गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाला एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल यावेळी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपा सरकारवर टीका केली. भाजपा सरकार सर्व पातळ्यावर अपयशी ठरले आहे. अमेरिकेबरोबरचा व्यापार करार, एपस्टिन फाईल्समुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी दबावात आहेत. सरकार विरोधातील प्रश्नावर जनमानसात माहिती पोहचवली पाहिजे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## सहकारी बँकांमध्ये 'मक्तेदारी'ला लगाम

नागपूर (दै. संध्या) : सहकारी बँकिंग क्षेत्रातील पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि नव्या नेतृत्वाला संधी देण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नव्या अधिसूचनेनुसार, आता कोणत्याही सहकारी बँकेच्या संचालकाला दोन टर्म म्हणजेच सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहता येणार नाही. या निर्णयामुळे अनेक वर्षापासून बँकांच्या संचालक मंडळावर कब्जा करून बसलेल्या दिग्गजांचे धाबे दणाणले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या या धडक निर्णयामुळे आगामी सहकारी बँकांच्या निवडणुकांमध्ये मोठी उलथापालथ पाहायला मिळणार आहे. आता प्रस्थापित संचालकांना आपली खुर्ची रिकामी करावी लागणार असून, नव्या चेहऱ्यांना संधी मिळेल.

## नागपूरमध्ये थरारक स्टंटचा दुर्दैवी शेवट !

नागपूर (दै. संध्या) : शहरात रात्री उशिरा बेफाम स्टंटबाजी करताना दोन तरुणांचा जीव गेला, आणि या धक्कादायक घटनेने नागपूरकरांमध्ये दुःख आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारच्या रात्री काचिपुरा परिसरातून वर्धा रस्त्यावर बुलेटवरून स्टंट करताना एका महिला दुचाकीस्वाराला कट मारण्याचा प्रयत्न करत असताना नियंत्रण चुकल्याने भीषण अपघात झाला. त्या धडकेत दोन्ही बुलेटस्वार १९ वर्षीय युग विशाल चनकापूर आणि १९ वर्षीय रुद्र शशिकांत सोमकुंवर यांचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी पोहचलेल्या स्थानिकांनी ताबडतोब दोन्ही जखमी तरुणांना जवळच्या रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातानंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते, कारण स्टंटबाजी करताना वाहनधारक वेगवान गतीने सिग्नल जंप करीत होते. पोलीस तपास करत असून बजाज नगर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत असे लक्षात आले आहे की, हा अपघात पूर्णपणे वेग आणि निष्काळजीपणामुळे झाला आहे. नागपूरमध्ये युवा पिढीचा स्टंटबाजीप्रती वाढता कल आणि रस्त्यावर अशा प्रकारच्या धोकादायक प्रयोगांचा परिणाम पुन्हा एकदा नकळत जीव घेऊन गेला.

# अपघाताची चौकशी करा

## ■ राष्ट्रवादी काँग्रेसची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी ■

मुंबई (दै. संध्या)

अजित पवार विमान अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी करणारे निवेदन आज राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली.

आज दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ, युवा नेते पार्थ पवार यांनी भेट घेतली.



दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची उद्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे राज्यसरकारकडून पत्रव्यवहार केला जाईल आणि ही सर्व चौकशी राष्ट्रवादी काँग्रेस सीबीआयमार्फत करू इच्छित आहे त्यासंदर्भात पाऊले उचलली जातील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वस्त केल्याची माहिती सुनिल तटकरे यांनी यावेळी दिली.

ज्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडली त्याचवेळी संबंधित खात्याचे केंद्रीय मंत्री नायडू, मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. यापूर्वी अशा घटनांसाठी स्वायत्त यंत्रणा नेमलेल्या आहेत. त्या यंत्रणांनी तपास सुरू केल्याचे घोषित केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडीमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. स्वायत्त यंत्रणा तपास करत आहेत पण सीबीआय तपास करत असताना आणखी व्यापकतेने तपास होऊ शकतो. ज्यावेळी स्वायत्त यंत्रणा तपास करत असतात त्यावेळी बाह्य देशातील यंत्रणाही अपघाती प्रकरणाचा तपास करत असतात असे सांगतानाच या प्रकरणाचा सखोलतेने तपास व्हावा. जे काही मुद्दे उपस्थित होत आहेत त्या सर्व मुद्द्यांचा तपास व्हावा आणि निष्कर्ष लवकरात लवकर राज्यातील नव्हे तर देशातील जनतेसमोर आणावा ही राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका असल्याचे सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

राज्यात झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत महायुती म्हणून कशापध्दतीने वाटचाल करु शकतो याबाबत भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासोबत आजच्या भेटीत चर्चा झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली.

## पुण्यात शिवजयंतीच्या सोहळ्याला ९६ स्वराज्यरथांची मानवंदना

पुणे (दै. संध्या)

शिवजयंती महोत्सव समिती, पुणेतर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवजयंती गुरुवारी, दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता लालमहाल येथून "शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा" या भव्यदिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. मिरवणुकीचे यंदा सलग १४ वे वर्ष आहे. सरसेनापती, सरदार, सुभेदार, वीर मावळे आणि वीर मातांच्या तब्बल ९६ स्वराज्यरथांचा सहभाग हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य असणार आहे, अशी माहिती सोहळ्याचे संकल्पक आणि समितीचे प्रवर्तक संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी दिली. दरवर्षी जिजाऊ-शहाजी शिवज्योत रथ एकापाठोपाठ येणारे सरदारांचे, मावळ्यांचे, वीर मातांचे स्फूर्ती देणारे ९६ स्वराज्यरथ, विविध पथकातील रणरागिणींच्या मर्दानी खेळांची चित्तथरारक मानवंदना, ढोल-ताशा पथकाचा रणगजर अशा उत्साही वातावरणात मिरवणुकीला सुरुवात होईल. या मिरवणुकीचे उद्‌घाटन केंद्रीय मंत्री मुरली मोहोळ, पुणे महापौर मंजूषा




नागपुरे, समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, पिंपरी चिंचवड महापौर रवी लांडगे, पोलिस उपायुक्त परिमंडळ १ कृषीकेश रावल, आमदार भीमराव तापकीर, चेतन तुपे, सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, शंकर मांडेकर तसेच सर्व स्वराज्यघराण्यांचे प्रतिनिधी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सुनील रासने, ज्येष्ठ विधिज्ञ प्रताप परदेशी उपस्थित राहतील.

## राज्यात ११ अतिरिक्त जिल्हाधिकारी

पुणे (दै. संध्या)

■ 'या' तालुक्यात होणार ६९ अतिरिक्त तहसील कार्यालये

वाढती लोकसंख्या तसेच शहरांचा होत असलेला भौगोलिक विस्तार आणि त्यातून महसूल विभागाच्या कामकाजाचा व्याप वाढत चालला आहे. हे लक्षात घेऊन राज्यातील सहा महसूल विभागात ११ अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची, तर ६९ अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांची नव्याने निर्मिती करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. यात पुणे विभागात तीन, तर अन्य सर्व विभागांत प्रत्येकी एक अतिरिक्त जिल्हाधिकारी नेमण्यात येणार आहेत. पुणे जिल्ह्यातील बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी, तर चाकण येथे अतिरिक्त तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनातील कामकाजाचा वाढता व्याप तसेच सामान्य नागरिकांना होणारा त्रास, जिल्ह्यांचा व तालुक्यांचा भौगोलिक व्याप, वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त तहसीलदार कार्यालय निर्मितीची गरज व्यक्त करण्यात येत होती. नव्याने अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मितीसाठी त्यात येणारी तालुक्यांची संख्या, या कार्यालय निर्मितीच्या अनुषंगाने लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, आदिवासी, तसेच दुर्गम क्षेत्र लोकसंख्या असलेल्या तालुक्यांची संख्या, जिल्हा मुख्यालयापासून प्रस्तावित कार्यालयाचे अंतर, तालुक्यांतील सर्वात दूरच्या गावांचे सध्याच्या मुख्यालयापासूनचे अंतर तसेच प्रस्तावित कार्यालय स्थापन झाल्यास येणारे अंतर, जिल्ह्याची लोकसंख्या, क्षेत्रफळ विचारात घेण्यात आले आहे.

## मुंडेंची माझ्याजवळ २२ प्रकरणे, मंत्री केल्यास राष्ट्रवादी संपेल : जरांगे

मुंबई (दै. संध्या)

आमचे लोक घातपात करून पुन्हा उचकवून देऊ नये, माझ्याकडे तुमची खूप प्रकरणे आहेत. मी अजून त्यात हात घातलेला नाही. तुमची लाभार्थी टोळी माझ्याविरोधात कशी लावली, हे चांगले माहिती आहे. तुम्ही बदनामी करत आहात. रंजना नागपूरकर नावाची महिला नागपूरहून माझ्याकडे आली होती. त्यांनी सांगितलेले एवढे भयानक प्रकरण आहे, त्यामुळे सावध राहा. इथून पुढे तरी माझ्या नादाला लागू नका, असा थेट इशारा मराठा आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांना दिला आहे. रंजना प्रदीप नागपूरकर ही महिला सकाळी येऊन माझ्या घरी खूप रडत होत्या. त्यांच्या



नवऱ्याचे निधन झाले आहे. मी फक्त संदेश दिला आहे की, तुमचेही खूप प्रकरणं माझ्याकडे आली आहेत. आमच्याच लोकांना घातपाताच्या सुपाऱ्या देत आहे. ते गप्प बसलेले होते, तरी तुमच्या टोळीने पुन्हा उचकवले आहे. माझे काहीच प्रकरण नाही. माझ्यावर केलेल्या प्रत्येक आरोपावर फौजदारी खटले दाखल केले, तर माझ्याविरोधात बोलणाऱ्याला संपूर्ण आयुष्य तुरुंगात जावे लागेल. आताच शहाणे व्हा. माझ्या नादी लागू नका. मी जर मागे लागलो तर माझ्याजवळ २२ पेक्षा अधिक प्रकरणं आलेली आहेत, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला. रक्ताने हात भरलेल्या लोकांना सरकार का सांभाळेल? भाजपमध्ये गेले तरी भाजप का मंत्रीपद देईल? संतोष भैया देशमुख यांना अजून न्याय नाही.

फक्त मंत्रिपद द्यायचे म्हटले होते तर अजितदादांचा पक्ष एवढा ट्रोल झाला. त्यामुळे मंत्रिपद दिले तर पक्ष संपेल. रक्ताने हात भरलेल्या लोकांवर कधीच बोलायचे नाही यामुळे माझा दिवस चांगला जात नाही. आम्ही पूर्ण माहिती घेत आहोत. धनंजय मुंडे यांनी आमच्या नादी लागू नये, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

## लंडनमधील वादग्रस्त भाषणाप्रकरणी राहुल गांधींच्या आवाजाचे नमुने घ्यावेत

पुणे (दै. संध्या)

■ सात्यकी सावरकरांचा कोर्टात अर्ज

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी लंडनमध्ये बदनामीकारक वक्तव्य केल्याप्रकरणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते व खासदार राहुल गांधी यांना सक्षम अधिकारी अथवा न्यायशास्त्र प्रयोगशाळेसमोर (एफएसएल) ) त्यांच्या आवाजाचा नमुना देण्याचे निर्देश द्यावे तसेच सक्षम न्यायवैद्यक प्राधिकरणाला पूर्वीच रेकॉर्डवर असलेल्या रेकॉर्डिंगसह संकलित केलेल्या नमुन्याचे वैज्ञानिक विश्लेषण आणि तुलना करण्याचे निर्देश द्यावेत असा अर्ज फिर्यादी सात्यकी सावरकर यांनी मंगळवारी विशेष न्यायालयात सादर केला आहे. राहुल गांधी यांनी मार्च २०२३ मध्ये लंडनमधील अनिवासी भारतीयांसमोर भाषण करताना स्वातंत्र्यवीर सावरकर




यांच्याविषयी बदनामीकारक विधान केले होते. त्यामुळे सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला आहे. पुण्यातील एमपीएमएलए विशेष न्यायालयात या दाव्याची सुनावणी सुरू आहे. बचाव पक्षाकडून फिर्यादी सात्यकी सावरकर यांची उलट तपासणी चालू आहे. सुनावणीदरम्यान सात्यकी सावरकर यांचे वकील अँड संग्राम कोल्हटकर यांनी न्यायालयात राहुल गांधी यांच्या आवाजाचे नमुने घेण्यासंबंधीचे निर्देश द्यावेत असा अर्ज केला आहे. न्यायालयाला आरोपी किंवा साक्षीदाराला असे नमुने देण्यास भाग पाडण्याचे पुरेसे अधिकार आहेत. विशेषतः, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीनएसएस ), २०२३ च्या कलम ३४९ नुसार दंडाधिकाऱ्यांना या संहितेअंतर्गत कोणत्याही तपासासाठी किंवा कार्यवाहीसाठी कोणत्याही व्यक्तीला आवाजाचे नमुने देण्याचे आदेश देण्याचा अधिकार आहे. कारण तो संशयिताची ओळख पटविण्यासाठी एकट्याने केलेल्या गुन्ह्याच्या कबुलीऐवजी वैज्ञानिक तुलना वापरून महत्त्वाचा पुरावा म्हणून काम करतो असे अर्जात नमूद करण्यात आले आहे. राहुल गांधी यांचे वकील अँड मिलिंद पवार यांनी फिर्यादी सात्यकी सावरकर यांची उलटतपासणी घेतली. राहुल गांधी यांच्या विरोधात सुरुवातीला प्रथमवर्ग न्यायाधीश अक्षी जैन यांच्या न्यायालयासमोर तीन वेळा युक्तिवाद झाला. मात्र, न्यायाधीश प्रकरणाची दखल घेण्यास तयार नसल्यामुळे वारंवार तारखा पडत होत्या हे फिर्यादीकडून मान्य करण्यात आल्याचा दावा अँड पवार यांनी केला.

दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी सात्यकी सावरकर यांनी अक्षी जैन या तत्कालीन न्यायाधीशांवर गंभीर आक्षेप घेत, भारतीय दंड संहितेतील कलम ४०८ अंतर्गत प्रमुख जिल्हा न्यायाधीश, पुणे यांच्यासमोर ट्रान्सफर पिटीशन दाखल केली. हा खटला दुसऱ्या सक्षम न्यायालयात वर्ग होईपर्यंत सुनावणी स्थगित करण्याची मागणीही करण्यात आली होती. ट्रान्सफर पिटीशनची दखल घेत तत्कालीन प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी न्यायाधीश अक्षी जैन यांच्याकडून गोपनीय अहवाल मागवला.

## अवघे जग अवाक्...! मुंबईच्या मरिन ड्राईव्हवर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष

मुंबई (दै. संध्या)

राजशिष्टाचार आणि कडेकोट सुरक्षा बाजूला सारून फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आज मुंबईच्या 'मरिन ड्राईव्ह'वर जॉगिंग करताना दिसले. भारताच्या तीन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर असलेले मॅक्रॉन सध्या मुंबईत असून, आज सकाळी त्यांनी चक्क सर्वसामान्य मुंबईकरांप्रमाणे मरिन ड्राईव्हच्या किनारपट्टीवर धावण्याचा आनंद घेतला. सुरुवातीला मरिन ड्राईव्हवर फिरणाऱ्या नागरिकांना आपल्या शेजारून धावणारी व्यक्ती फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष आहेत, हे लक्षातच आले नाही. मात्र, काही वेळाने त्यांची ओळख पटताच तिथे उपस्थित असलेल्या लोकांमध्ये एकच खळबळ उडाली. जगातील एका



शक्तिशाली देशाचे राष्ट्राध्यक्ष कोणत्याही बडेजावाशिवाय, कोणतीही असुरक्षा, धोका मनात न बाळगता मुंबईच्या रस्त्यावर जॉगिंग करत असल्याचे पाहून अनेकजण अवाक झाले. मॅक्रॉन यांची ओळख पटल्यानंतर मॉर्निंग वॉकला आलेल्या मुंबईकरांनी त्यांना पाहण्यासाठी गर्दी केली. अनेकांनी आपल्या मोबाईल फोनवर त्यांचे व्हिडिओ रेकॉर्ड केले, तर काहींनी त्यांना अभिवादनही केले.

# टिपू सुलतान वादावर हर्षवर्धन सपकाळांकडून दिलगिरी

मुंबई (दै. संध्या)

मालेगाव महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतानचा फोटो लावण्यावरून महाराष्ट्रात वाद सुरु झाला होता. याचदरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी तुलना करून नव्या वादाला तोंड फोडले. यावर प्रतिक्रिया देताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांवर टीका केली. इतकेच नव्हे तर अनेक पक्षातील राजकीय मंडळींनी सपकाळ यांच्यावर टीका केली. अखेर आज सपकाळ यांनी फेसबुक पोस्टवरून दिलगिरी व्यक्त केली. शिवप्रेमी



बंधू-भगिनींनो, सप्रेम नमस्कार, सरकारी कार्यालयांमध्ये विविध महापुरुषांचे फोटो एकत्र लावल्याने समाजात तेढ निर्माण होणार नाही, तर ऐक्याचा संदेश जावा, या आशयाचे माझे ७० सेकंदांचे वक्तव्य होते. दुर्दैवाने, त्या विधानातील एका शब्दाचा संदर्भ तोडून जाणीवपूर्वक विपर्यास करण्यात आला. सोशल मीडियावर दिशाभूल करणाऱ्या मोहिमा चालवून मी जे बोललोच नाही ते माझ्या तोंडी घालण्यात आले आणि छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना केली, असा चुकीचा समज निर्माण करण्यात आला. भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या पिलावळीकडून हा अपप्रचार नियोजनपूर्वक पसरवण्यात आला. त्याआधारे राज्यात धार्मिक तेढ निर्माण करून दंगली घडवण्याचा प्रयत्न झाला हे आपण पुण्यात पाहिले आहे. मी पुन्हा एकदा स्पष्ट आणि ठामपणे सांगतो, छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे. ते माझे आदर्श, प्रेरणास्थान आणि स्वाभिमान आहेत. त्यांच्या तुलनेचा प्रश्नच उद्भवत नाही,मी केलेली नाही. टिपू सुलताननी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आणि त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इंग्रजाविरूद्ध लढा दिल्याचे मी म्हटले होते. त्यांच्या योगदानाची दखल घेत थेट भारताच्या संविधानामध्ये देखील त्यांची तसबीर आहे त्यांच्या प्रतिमेच्या संदर्भात समाजात तणाव वाढू नये, सर्वांनी परस्पर सन्मान आणि बंधुभाव जपावा, हा माझ्या वक्तव्याचा गाभा होता. इतिहासावर मतभेद असू शकतात; मात्र त्यावर संयत, अभ्यासपूर्ण चर्चा व्हावी आणि समाजात संघर्ष निर्माण होऊ नये,जात-धर्म-पंथावर ध्रुवीकरण अजिबात खपवून घेता कामा नये,हीच भूमिका मी मांडली होती.

## इथे सुरक्षारक्षक का नाही : महापौरांचा सवाल

पुणे (दै. संध्या)

पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच प्रशासनात शिस्त आणण्याच्या दृष्टीने पावले उचलत, मंजुषा नागपुरे यांनी पुणे महानगरपालिका मुख्य प्रशासकीय भवनाची अचानक पाहणी केली. या पाहणीत सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड झाल्याने महापौरांनी सुरक्षा विभागातील अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली. या दरम्यानचा व्हिडिओ चर्चेत आला आहे.

सोमवारी सकाळी महापौर नागपुरे यांनी मुख्य भवनाच्या प्रवेशद्वाराची तपासणी केली.यावेळी काही ठिकाणी सुरक्षारक्षक अनुपस्थित असल्याचे दिसून आले. महापौरांनी तत्काळ



संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा करत स्पष्ट शब्दांत सांगितले की, महापालिकेसारख्या महत्त्वाच्या प्रशासकीय इमारतीत सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही ढिलाई चालणार नाही. यावेळी महापौरांनी सुरक्षा विभागाला पुढील सूचना दिल्या त्या म्हणाल्या, प्रवेशद्वारांवर २४ तास सुरक्षारक्षक उपस्थित असावेत, सीसीटीव्ही व्यवस्था नियमित तपासावी, अभ्यागत नोंदणी प्रक्रिया काटेकोर करावी, सुरक्षा यंत्रणेचे नियमित ऑडिट करावे, तसेच, त्रुटी तातडीने दूर करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले.

नवनियुक्त महापौरांनी पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच आठवड्यात घेतलेल्या या कारवाईमुळे प्रशासनात शिस्त आणि जबाबदारीचा स्पष्ट संदेश गेला आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षेबाबत महापालिका गंभीर असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

# संपादकीय

## एआय सर्वांसाठी

सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे. सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली. लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे. नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे. एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे.

## गुरु वचन



### सौंदर्य व प्रेम

सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले आहेत, जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य आहे. सत्यम, शिवमसोबत परमात्माचे तिसरे वैशिष्ट्य सुंदरम असल्याचे सांगण्यात आले आहे. ते सुंदरच नाही पण सौंदर्यांचा मुळ स्त्रोत त्याचे अस्तित्व, सौंदर्य शाश्वत आहे. जग त्या सौंदर्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन आहे. शाश्वत सौंदर्याचे कलम त्यातूनच प्रस्फुटित होऊन सर्व जड-चेतनात सौंदर्य अभिसिंचन करते. वैदिक दर्शनानुसार रूपम रूपम प्रतिरूपो बभूव म्हणजे प्रकृतीची अव्यक्त अवस्था दर्पण आहे ज्यात चैतन्य ज्योतीचा आभास होतो. जितके मूर्त रूप आहेत ते सर्व त्या परब्रह्मरूपी ज्योतीचे प्रतिबिंब आहेत. त्याच एक परमात्म्याच्या परम ज्योतीने सुर्य व चंद्र प्रकाशमान आहेत. रात्र आपल्या असंख्य नेत्ररूपी ताऱ्यांनी त्या सौंदर्याचे दर्शन करते. परमात्म्याच्या अंश असल्याच्या नात्याने जीवात्मा सुद्धा प्रत्येक सुंदर वस्तुकडे आकर्षित होतो. प्रकृतीचे मनोरम दृश्य, हिरवळ, फुलांचे उद्यान, नदी, पर्वत इत्यादी पाहून कुणाचे मन फुलणार नाही? सौंदर्याकडे आकर्षण अंतरतम्ची अभिव्यक्ती आहे, जी शाश्वत सौंदर्याचा शोध घेते. कबीर त्या शाश्वत सौंदर्याला चोहीकडे पाहतात- लाली मेरे लाल की, जित देखौं तित लाल। सौंदर्य प्रेमींनी त्या सौंदर्यास नारीत पाहिले व त्यात ब्रह्माची कल्पना केली. असे मधुर व कोमल अवलंबन ब्रह्माव्यतिरिक्त दुसरे कुणीही असू शकत नाही कारण ते प्रेमरूप आहे, परम सुंदर आहे व त्याचे सौंदर्य विश्वाच्या चराचरात आहे. त्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्काराने अज्ञानरूपी अंधार नष्ट होतो, जन्म-जन्माचे पाप धुतले जातात. प्रेम मिळवण्यासाठीच ब्रह्माने सृष्टीची रचना केली व जीवाच्या हृदयात प्रेम निर्माण केले. एकीकडे हे प्रेम साधकाच्या हृदयातील सर्व कलुषित भावना, वासना व आकांक्षा नष्ट करुन हृदय स्वच्छ करते. दुसरीकडे त्याच्या हृदयास त्या अनंत सौंदर्य रसाने परिपूर्ण करते. प्रेम खऱ्या प्रेमीस कधीच थकू देत नाही. ते त्यास नित्य नवीन शाश्वत सौंदर्याची अनुभूती करुन देत राहते.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 6 | 2 | | | | | 9 |
| | 9 | | 3 | 6 | 8 | | 2 | 7 |
| 8 | | | | 9 | | | | |
| 5 | 7 | 1 | | | | 9 | | |
| | | | 9 | | 5 | | | |
| | | 2 | | | | 5 | 7 | 3 |
| | | | | 4 | | | | 1 |
| 6 | 5 | | 1 | 3 | 2 | | 9 | |
| 1 | | | | | 7 | 2 | 5 | 4 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 4 | 6 | 9 | 3 | 1 | 8 | 2 | 7 |
| 2 | 7 | 9 | 5 | 8 | 6 | 4 | 1 | 3 |
| 8 | 3 | 1 | 4 | 7 | 2 | 9 | 6 | 5 |
| 9 | 2 | 5 | 1 | 4 | 3 | 7 | 8 | 6 |
| 3 | 6 | 7 | 8 | 2 | 9 | 5 | 4 | 1 |
| 1 | 8 | 4 | 7 | 6 | 5 | 2 | 3 | 9 |
| 6 | 5 | 8 | 2 | 1 | 7 | 3 | 9 | 4 |
| 7 | 1 | 2 | 3 | 9 | 4 | 6 | 5 | 8 |
| 4 | 9 | 3 | 6 | 5 | 8 | 1 | 7 | 2 |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६२



**आडवे शब्द**
१. भ्रमर, भुंगा
४. सापकिरडू
७. विसराळू
१०. गरीब, दीन
१२. पातळ खांब
१५. कपाळ
१७. आईचा भाऊ
१९. मज्जाव
२०. फुरसत
२१. एक श्वासरोग
२२. नवरा
२३. भाकरीचे एक धान्य
२४. उद्याच्या नंतरचा दिवस
२६. माहेरी आलेली स्त्री
२८. शिक्षा, २९. दिवटी
३२. महासर्प
३५. पाणी
३६. चलनवलन
३९. तमाशा
४०. थेट
४१. केशरी गराचे एक फळ
४२अ. मोल, भाव
४३. संरक्षक आवरण
४४. दात
४५. पहाऱ्याचे काम
४८. स्वत:ला
४९. गोंजारणे, समजूत काढणे
५०. अखंड
५१. मैत्रीण
५२. तोंड
५३. पुन्हा पुन्हा
५७. मित्र
६०. चेष्टा, टिंगलटवाळी
६१. सीतेचे वडील
६३. एक चतुर्थांश
६५. माफी मागणारा
६७. लहान मुलांची गाणी
७०. रजतपदक
७३. चिंचेची चव
७४. तात्पुरते रुसणे
७५. जबानी
७६. कविवार्य बोरकर यांचे टोपणनाव
७७. सबब, निमित्त

**उभे शब्द**
१. टप्प्या टप्प्यानी केलेली प्रवास
२. अलमारी
३. दारूचा एक प्रकार
५. चौक
६. मार्गस्थ
८. मध्यम प्रमाण
९. आकांत करणे
११. रमापती
१३. शिर्डीचे संत
१४. कट्टर
१६. तिबेटी धर्मगुरु
१८. संगीतातील एक राग
१९. मृत्यू
२५. काढलेली सुट्टी
२६. सामान
२७. थंड
३१. रेशमी वीण असलेल्या पदराची साडी
३२. फावला वेळ
३३. विश्व
३४. बोचणारे बोल
३६. हस्तलाघव
३७. रेशमाची गुंडाळी
३८. गडीमाणसे
४१. आपला नसलेला
४२. प्रश्न
४२अ. सौरव गांगुलीचे टोपणनाव
४३. विद्या
४६. अफूचे बी
४७. निकट, जवळ
४८. मनातील इमले
५१. मनात हेतू धरून केलेले काम
५३. पारखी
५४. मुलगी
५५. धोबी
५६. शरीर
५८. वैयक्तिक
५९. मेहेरबानी
६२. खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
६४. राबता, जाणे येणे
६६. नाकातील दागिना
६८. खोटी तात्पुरती भावना
६९. युवक
७०. चांदी
७१. अर्धी ओंजळ
७२. सावध
७३. हरबरा इ. पिकावरील आंबट द्रव

**जम्बो शब्दकोडे क्र. ८६२ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.एकमेव ४.कविता ७.हलकट १०.रथचक्र ११.रोमहर्षक १३.वाणी १४.कावकाव १५.रामराम १७.वाचाळ १९.बार २०.रस २२.वीज २३.वारसा २७.मखर २८.बाप २९.बासन ३०.कपाळमोक्ष ३२.खबरदार ३४.वाट ३५.आळस ३६.वातड ३८.खार ३९.कोट ४०.भाट ४१.खत्रुड ४३.टरटरणे ४४.नाट ४६.पायस ४७.रसा ४९.सकटनिकट ५१.पोरीबाळी ५३.वही ५५.वाफ ५६.कानीकपाळी ५८.घाणेरी ५९.कणखर ६१.होम ६३.कर ६५.सबर का ६८.बाळ ६९.नेने ७०.तपशीलवार ७४.शिबंद ७७.गरम ७८.रावा ८०.चलनवलन ८३.अंतर्गत ८४.तळजाई ८५.वणवा

उभे उत्तर : १.कडेवर ३.वरवर ४.कचरा ५.विक्रमवीर ६.सोम ७.हर्ष ८.लकवा ९.टवाळ ११.रोम १२.हजर १४.काबाडकष्ट १६.राज १८.चालबाज २१.समक्ष २३.वापर २४.सागरतट २५.मनमरणे २६.पळवाट २८.बाब ३१.मोट ३२.खसखस ३३.दावा ३५.आटपाट ३७.डरकाळी ३८.खार लावणे ३९.कोटकल्याण ४२.डरपोक ४४.नास ४५.शनिवार ४८.सारीपाट ५०.कफ ५२.बाळी ५४.हिरीरीने ५५.वार ५७.नीडर ५८.धार ५९.कपात ६०.खलाशी ६२.मस ६३.कळ ६४.गवार ६६.बळीराजा ६७.काशी ६८.बादल ७१.परत ७२.लगत ७३.रमत ७५.बंच ७६.श्रावण ७९.वाई ८१.नव ८२.लवा

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८८४ – जर्नल चार्ल्स गोरडन खरतूम पोहचले.
- १९३२ – जपानने मनचुरीयाला स्वतंत्र घोषित केले.
- १९७५ – दुसरा अमेरिकन संगीत पुरस्कार कार्यक्रम.
- १९७९ – नासाने आपले एस-२०२ यान प्रक्षेपीत केले.
- २००७ – नासाने एकाच यानातून पाच उपग्रह सोडले.

### राष्ट्रीय

- १९९६ – विश्व चषक सामन्यात भारताने केनियाला हरवले, सचिन तेंडुलकरने १२७ धावा जमवल्या.
- २००८ – फॅशन डिझायनर कुंजूम बुधिराजा हत्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने रोमेश शर्मा आणि त्याच्या पाच साथीदारांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

### निधन

- ०९९९ – ग्रीगोरी व्ही., पहिले जर्मन पोप यांचे निधन.
- १९३२ – फ्रीड्रीक ॲगस्टस तिसरा, साक्सोनचे राजा यांचे निधन.
- १९३८ – एडवर्ड अनसीली, बेलजीयन रेल्वे मंत्री यांचे निधन.
- २००८ – डॉ. हरिश्चंद्र सिंग, समाजवादी पक्षाचे नेते अमरसिंगांचे वडिल यांचे निधन.
- २००८ – प्रमोद गुरुजी, ज्येष्ठ कलादिग्दर्शक यांचे निधन.

### जन्म

- १८३६ – स्वामी रामकृष्ण (गदाधर चटर्जी) यांचा जन्म.
- १८५८ – लुईस एम.ए. बेलजीयमची राजकुमारीचे जन्म.
- १९३१ – जॉनी हॉर्ट, व्यांगचित्रकाराचे जन्म.

## उपदेशकथा

### जशी मनोरचना तसे साधन

एका माणसाने एका साधूला विचारले, ईश्वर दर्शनासाठी घरदार सोडावेच लागते का? साधूने उत्तर दिले, कोण म्हणतो? संसारात राहून जनकाने ईश्वरदर्शन करून घेतले. आपल्यालासुद्धा ते साधेल. दुसऱ्या एका माणसाने त्याच साधूला विचारले, घरदार सोडल्याशिवाय ईश्वर दर्शन होऊ शकते काय? साधूने उत्तर दिले, कोण म्हणतो? घरदारात राहून ईश्वरदर्शन झाले असते तर श्री समर्थांसारखे संसारातून का निवृत्त झाले असते? साधूने दिलेली उत्तरे परस्परविरोधी दिसतात. पण दोन्ही उत्तरे बरोबर आहेत. ज्याची मनोवृत्ती जशी असते तशी साधना त्याला करावी लागते. सर्वांना एक नियम उपयोगी पडत नाही.

कथा उपदेश : जगात विविध स्वभावाचे लोक असतात. एकाच औषधाने साऱ्यांचे रोग दूर होत नाही. त्यामुळे अध्यात्मातही हा नियम लागू होतो. म्हणून जो तो आपल्या आवडत्या दैवतांची पूजा करीत असतो.

## : SMS :

Biwi-Tumhe kuch yaad b rehta hai?
Aj hamari wedding Anniversary hai..
Pati-Oh main to bhul hi gaya thA...

Aao.
2 mint.ka moun rakhen..

## पंचांग



पंचांग
१८ फेब्रुवारी २०२५
बुधवार
विक्रम संवत्- २०८२
फाल्गुन शके
संवत्- १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- फाल्गुन
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:प्रतिपदा १६:५७:४९
नक्षत्र:शतभिषा २१:१५:५२
योग:शिव २२:४४:४३
करण:बव १६:५७:४९
करण:बालव २८:३१:२१+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:कुम्भ
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – शाबान
तारीख – २९
विशेष
चंद्रदर्शन
फाल्गुन मासारंभ
निळोबाराय यात्रा – प्रारंभ – पिंपळनेर (अहिल्यानगर)

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २९ | १७.४ |
| अहमदनगर | २८.७ | १६.७ |
| अकोला | ३१.६ | १७.५ |
| अमरावती | ३०.७ | १८.२ |
| बीड | ३२.१ | १६.८ |
| भंडारा | ३१.३ | १६.२ |
| बुलढाणा | २६.८ | १०.८ |
| चंद्रपूर | ३१.९ | १८.७ |
| चेन्नई | ३१.३ | २१.९ |
| नवी दिल्ली | २७.३ | १२.६ |
| धुळे | ३१.५ | १६.३ |
| गोंदिया | २९.८ | १७.९ |
| जळगाव | ३१.७ | १६.८ |
| कोल्हापूर | ३०.२ | १५ |
| लातूर | ३०.२ | १८ |
| मुंबई | ३१.१ | २३.३ |
| नागपूर | ३०.३ | १९.१ |
| नांदेड | ३१.६ | २०.२ |
| नंदूरबार | २९.८ | १७.५ |
| नाशिक | ३०.२ | १४.१ |
| पुणे | २९.३ | १६.५ |
| पंढरपूर | ३०.७ | १८.२ |
| सातारा | ३०.५ | ११.४ |
| सांगली | ३०.८ | १५.९ |
| सोलापूर | ३१ | १९.५ |
| वर्धा | ३१.६ | १८.५ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व
आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण होण्याचे योग आहेत.

**तुळ :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
विरोधकांवर मात केल्यामुळे किर्तीत वाढ होईल. व्यापाराचे क्षेत्र विस्तृत होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: उत्तर
मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही. प्रवास त्रासदायक राहील.

**मिथुन :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम
प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो.

**धनु :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा : उत्तर
प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील.

**कर्क :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल.

**मकर :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे. घराची अडचण दूर होईल.

**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल. आखलेल्या योजना पूर्ण होणार नाही.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
आपल्या आपक्षेप्रमाणे फळ मिळणार आहे. चैनीच्या वस्तू खरेदी करण्याचा योग आहे.

**कन्या :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पश्चिम
व्यवसायात अनकुल असे यश मिळेल. कौटुंबामध्ये सुख व शांतीचे वातावरण लाभेल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
काम करण्याच्या पद्धतीत सुधारणा होईल. फायदेशीर व्यवहार राहतील. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पावन प्रतिष्ठानच्यावतीने महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम महाप्रसाद वाटप



पुणे (दैनिक संध्या) : पावन प्रतिष्ठानच्या वतीने महाशिवरात्री महोत्सवानिमित्त घोरपडी पेठ येथील घोरपडे उद्यान जागृत महादेव मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. मंदिरामध्ये महा पूजा. यज्ञ होम. हवन. लघुरुद्र अभिषेक. महिला भजनी मंडळाच्या वतीने भक्ती गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. तसेच भक्तांसाठी खिचडी वाटप व महाप्रसादाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक गणेश कल्याणकर यांनी केले होते.

### तरुणाईचा प्रेरणादायी संकल्प; 64 जणांनी स्वीकारले संयम जीवनाचे कठोर व्रत



पुणे (दैनिक संध्या) : जैन शासनाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवला जाईल असा अविस्मरणीय क्षण 'संयमरंग उत्सवा'दरम्यान अनुभवायला मिळाला. तब्बल ६४ मुमुक्षूंनी सांसारिक जीवनाचा त्याग करून जैन दीक्षा स्वीकारली. सुमारे २५ हजारांहून अधिक भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य दीक्षा सोहळ्याने संपूर्ण परिसर आध्यात्मिक उर्जेने भारावून गेला. हा महोत्सव शांतिचंद्रसूरी समुदायाचे गच्छाधिपती आचार्य सोमसुंदरसूरीजी, आचार्य योगतिलकसूरीजी, आचार्य कुशलचंद्रसूरीजी आणि आचार्य पुण्यसुंदरसूरीजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न झाला. आचार्य भगवंतांच्या आशीर्वादाने दीक्षार्थींनी संयम, त्याग आणि साधनेचे कठोर व्रत स्वीकारले. 'रजोहरण' अर्पण विधीच्या वेळी संपूर्ण मैदान "जैनं जयति शासनम्" या घोषणांनी दुमदुमून गेले. दीक्षा विधीदरम्यान अनेक कुटुंबांसाठी तो अत्यंत भावनिक क्षण ठरला. विशेष आकर्षण ठरले अध्यात्म परिवाराशी संबंधित युवा कार्यकर्ते ऋषभभाई आणि त्यांची धर्मपत्नी सोनलबेन यांचा दृढ संकल्प. दोघांनीही तरुण वयात संसाराचा त्याग करून आजीवन ब्रह्मचर्य स्वीकारत उपस्थितांना प्रेरणेचा संदेश दिला. या प्रसंगी महाराष्ट्र सरकारचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी उपस्थित राहून दीक्षार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भावनांना अभिवादन केले. जैन समाजातील विविध ट्रस्टचे मान्यवर, संस्थांचे प्रतिनिधी आणि हजारो भाविकांनी सोहळ्यास उपस्थिती लावली होती. असाच भव्य दिव्य ६४ संयमींची 'वडी दीक्षा' सोहळा येत्या ७ मार्च रोजी मुंबईतील बोरिवली येथे श्री शांतिचंद्र शताब्दी महोत्सवानिमित्त भव्य उत्सवात पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.




### नात्यांच्या गुंत्यातील भावविश्व अधिक गहिरे करणारा 'माया'चा ट्रेलर प्रदर्शित!

पुणे (दैनिक संध्या) : नातेसंबंधांवर भाष्य करणारे चित्रपट प्रेक्षकांना नेहमीच आपलेसे वाटतात. कारण ते केवळ कथा सांगत नाहीत, तर आयुष्यात व्यक्त न केल्या गेलेल्या भावनांना शब्द देतात. अशाच भावविश्वाला स्पर्श करणाऱ्या 'माया' या चित्रपटाचा ट्रेलर आता प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'माया'चा ट्रेलर एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतो, माणूस खरोखरच एकटेपणाला घाबरतो की पोरकेपणाच्या भावनेला? नात्यांमध्ये निर्माण होणाऱ्या गैरसमजुती, मनात साचत जाणाऱ्या अढी आणि त्या अढीमुळे दुरावत जाणारी माणसं यांचा भावनिक प्रवास ट्रेलरमध्ये प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आयुष्य पुढे सरकण्यासाठी आवश्यक असलेली भावनिक मुक्तता आणि समजूतदार संवाद यांची जाणीव करून देणारा हा ट्रेलर विचार करायला भाग पाडतो. चित्रपटात सिद्धार्थ चांदेकरने साकारलेली हाऊस फादरची भूमिका ट्रेलरमध्ये मध्यवर्ती ठरते. मुलीमध्ये रमलेला पण स्वतःच्या भावनांपासून काहीशी दूर गेलेली ही व्यक्तिरेखा मनाच्या खोल कप्प्यात डोकावते. मुक्ता बर्वेची व्यक्तिरेखा आयुष्याच्या वळणावर उभी राहून स्वतःचे प्रश्न शोधताना दिसते, तर विजय केंकरे आणि रोहिणी हट्टंगडी यांचे अनुभवसंपन्न अस्तित्व कथेला स्थैर्य आणि वास्तवाची किनार देते. ट्रेलरमध्ये प्रत्येक पात्राच्या नजरेतून वेगवेगळ्या वेदना आणि आशा डोकावताना दिसतात. विशेष म्हणजे, ट्रेलरमध्ये संवादांपेक्षा नजरेतून व्यक्त होणं, शांतता आणि प्रसंगांची मांडणी अधिक बोलकी ठरत आहेत. काही क्षण तर असे आहेत की, शब्दांशिवायही मनात खोलवर ठसतात. गिरीश ओक यांची भूमिका या भावविश्वाला वेगळा परिमाण देते. त्यांच्या व्यक्तिरेखेतील अंतर्गत संघर्ष, न सांगितलेले आघात आणि स्वतःभोवती उभारलेली भिंत यामुळे कथानकाला एक गूढ आणि गंभीर स्वर मिळतो. ट्रेलरचा शेवट आश्वासक असला तरी तो अनेक प्रश्नही उभे करतो आणि याच प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर मिळणार आहेत.

# 'सेवा फेस्ट २०२६' उत्साहात; नागरिकांची सहकुटुंब उपस्थिती

पुणे (दै. संध्या) :

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'International Year of Volunteering' म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर सेवा सहयोग फाऊंडेशन आयोजित "सेवा फेस्ट – २०२६ : उत्सव सेवेचा" हा भव्य सामाजिक महोत्सव सिंहगड रोड येथील 'कलाग्राम'मध्ये उत्साहात पार पडला. सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या महोत्सवाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्वयंसेवक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, सीएसआर अधिकारी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुमारे सात हजारांहून अधिक नागरिकांनी कुटुंबासह भेट देत उपक्रमांचा अनुभव घेतला.



कार्यक्रमाची सुरुवात विविध सेवा क्षेत्रात कार्यरत मान्यवरांच्या प्रेरणादायी मनोगतांनी झाली. यावेळी गरवारे टेक्निकल कॉलेजचे अध्यक्ष विवेक कुलकर्णी, के.जे. ग्रुप ऑफ इंजिनियरिंगचे विनोद जाधव, इन्फोसिसचे प्लांट डीसी हेड प्रवीण कुलकर्णी, सेवा सहयोग फाऊंडेशनचे संचालक किशोर मोघे आणि सेवा फेस्ट २०२६चे प्रकल्प समन्वयक विनीत कोंडेजकर उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात प्रवीण कुलकर्णी यांनी स्वयंसेवकांनी कुटुंबासह सेवा उपक्रमांत सहभागी व्हावे, यावर भर दिला. स्वयंसेवेचा संस्कार लहानपणापासून मुलांमध्ये रुजल्यास सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक बळकट होते, असे त्यांनी नमूद केले. "समुत्कर्ष" प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सृजनशील कार्यक्रमांनी उत्सवाची प्रेरणादायी सुरुवात झाली.

उत्सवादरम्यान "किशोरी विकास" माहिती पुस्तिका, "चेतना" प्रकल्पाचे पुस्तक तसेच "महिला सक्षमीकरण दशकपूर्ती" पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महिला बचत गटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू आणि खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सना नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.


सेवा सहयोगच्या विविध प्रकल्पांचे एकूण ३९ स्टॉल्स उभारण्यात आले होते. या माध्यमातून सामाजिक उपक्रम, यशोगाथा, प्रशिक्षण आणि जनजागृती यांची माहिती देण्यात आली. "सीएसआर मीट", "एज्युकेशन मीट" आणि "सेवा कट्टा" या संवाद सत्रांतून सामाजिक क्षेत्रातील विविध विषयांवर चिंतन आणि मार्गदर्शन झाले. समस्यांवर उपाययोजना आणि भविष्यातील दिशा यावरही चर्चा करण्यात आली.

या महोत्सवाला खासदार मेधा कुलकर्णी, नगरसेवक कुणाल टिळक तसेच लेखक-दिग्दर्शक किरण यज्ञोपवित यांनी भेट देत सेवा सहयोगच्या सातत्यपूर्ण समाजकार्याचे कौतुक केले.

उत्सवादरम्यान उपस्थित स्वयंसेवक आणि नागरिकांनी समाजाच्या भल्यासाठी शाश्वत बदल घडविण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याची "सेवा प्रतिज्ञा" घेतली. स्वयंसेवकांचा ध्यास, समर्पण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी या महोत्सवातून प्रकर्षाने जाणवली.

"सेवा फेस्ट २०२६" हा केवळ एक कार्यक्रम न राहता समाजातील माणसांना एकमेकांशी जोडणारी आणि स्वयंसेवेची प्रेरणा देणारी सशक्त चळवळ ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## सॅमसंग गॅलेक्सीची नवी श्रेणी, २५ फेब्रुवारीला होणार लॉंन्च



पुणे (दै. संध्या) :

सॅमसंग गॅलेक्सीची नवी एस श्रेणी दाखल होणार असून यामुळे एआयचा अनुभव यामुळे अधिक सुसज्ज होणार आहे. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स सॅन फ्रान्सिस्कोमध्ये गॅलेक्सी अनपॅकचे आयोजन करणार आहे. या इव्हेण्टचे सॅमसंगच्या संकेतस्थळावर तसेच सॅमसंग न्यूजरूम इंडिया आणि सॅमसंगच्या यूट्यूब चॅनेलवर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ११.३० वाजता लाइव्ह स्ट्रिमिंग करण्यात येणार आहे. नव्या स्मार्टफोनसंदर्भात उपलब्ध असलेल्या विशेष फायद्यांबाबत माहिती मिळवण्यासाठी samsung.com/unpacked येथे नोंदणी करण्याचे आवाहन कंपनीतर्फे करण्यात आले आहे.

## संविधान, न्याय आणि संघर्षाची कहाणी...

**'कलम का बादशाह' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला; मोनालिसा बागलचा दमदार कमबॅक**

पुणे (दै. संध्या) :

संविधानाची ताकद, कायद्याची धार आणि अन्यायाविरोधातील लढ्याची धग यांचा संगम असलेला कलम का बादशाह हा नवा मराठी सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. निर्माता व्हि. एम. भैलुमे आणि दिग्दर्शक आनंदकुमार सरवदे यांच्या टीमने साकारलेला हा चित्रपट सामाजिक आशय, थरार आणि विचारप्रवर्तक कथानक यामुळे चर्चेत आला आहे.

सत्तेला प्रश्न विचारणारी आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभा राहणारी ही कथा 'दीक्षा' आणि 'जय' या दोन तरुणांच्या संघर्षाभोवती फिरते. अन्याय, भीती आणि सत्तेच्या दबावासमोर न झुकता ते संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांच्या आधारे लढा उभारतात. कायदा हेच त्यांचे शस्त्र ठरते, तर धैर्य ही त्यांची खरी ताकद बनते. व्यवस्थेतील त्रुटींना भिडणारी ही कथा केवळ मनोरंजनापुरती न राहता समाजाला विचार करायला भाग पाडणारी ठरते.

चित्रपटात अभिनेत्री मोनालिसा बागल, यश डिंबळे, आनंद शिंदे आणि जय मोर्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत. २०२३ मधील 'रावरंभा'नंतर काही काळ पडद्यापासून दूर राहिलेली मोनालिसा बागल 'कलम का बादशाह'मधून पुन्हा एकदा दमदार भूमिकेत दिसणार असून तिच्या कमबॅककडे प्रेक्षकांचे विशेष लक्ष लागले आहे. अभिनयातील प्रामाणिकता, भावनांची प्रभावी अभिव्यक्ती आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण ही तिची ओळख पुन्हा एकदा या चित्रपटातून पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. आर. बी. फिल्म्स प्रॉडक्शनच्या बॅनरखाली साकारलेल्या या सिनेमाचे छायाचित्रण मनीष वि. सोनी यांनी केले असून पटकथा व संवाद कल्पेश जगताप यांनी लिहिले आहेत.




संविधानाच्या मूल्यांवर आधारित आशय, प्रभावी अभिनय आणि सशक्त मांडणीमुळे 'कलम का बादशाह' हा सिनेमा प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव ठरणार आहे. मनोरंजनासोबतच समाजाला प्रश्न विचारायला भाग पाडणारा आणि न्यायासाठी उभे राहण्याची प्रेरणा देणारा हा चित्रपट लवकरच आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

## राष्ट्रीय टी-20 ब्लाइंड क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व पश्चिम बंगालची विजयी सलामी

पुणे (दै. संध्या) :

द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन (PBMA) आणि ब्लाइंड क्रिकेट असोसिएशन (BCA) यांच्या संयुक्त विद्यमाने, एचसीएल फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित राष्ट्रीय टी-20 क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धेला दमदार सुरुवात झाली. डेक्कन जिमखाना आणि पद्मावती येथील टेंबेकर मैदानावर सुरू असलेल्या गट साखळी सामन्यांत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर दणदणीत विजय मिळवत स्पर्धेत विजयी सलामी दिली.



अ गटातील पहिल्या सामन्यात अभिजीत शिरोड यांच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्राने मध्य प्रदेशचा ९९ धावांनी पराभव केला. महाराष्ट्राने २० षटकांत बिनबाद २१२ धावा केल्या. शिरोड यांनी नाबाद १०५ धावा केल्या आणि गोलंदाजीत १-१२ अशी कामगिरी बजावली. मध्य प्रदेशचा डाव १४.४ षटकांत ११३ धावांवर संपुष्टात आला.

कर्नाटक संघाने उत्तर प्रदेशचा ११७ धावांनी पराभव करत स्पर्धेत दमदार एन्ट्री केली. सागर एस यांनी नाबाद ८१ धावांची खेळी करत संघाला १९७ धावांपर्यंत मजल मारून दिली. उत्तर प्रदेशचा संघ केवळ ८० धावांत गारद झाला.

ब गटातील सामन्यात प्रसनजीत अडक यांच्या नाबाद १२० धावांच्या शतकी खेळीच्या जोरावर पश्चिम बंगालने राजस्थानवर २३३ धावांनी विजय मिळवला. पश्चिम बंगालने १५ षटकांत ३०४ धावांचा डोंगर उभा केला, तर राजस्थानचा डाव ७१ धावांत आटोपला.

स्पर्धेतील सर्वात मोठा विजय गुजरात संघाच्या नावे नोंदवला गेला. अनिल गरिया (नाबाद २००) आणि गणेश भुसारा (नाबाद १४७) यांच्या अष्टपैलू खेळीमुळे गुजरातने २० षटकांत बिनबाद ३८८ धावा केल्या. प्रत्युत्तरात चंदीगढचा संघ अवघ्या ३२ धावांत बाद झाला. गुजरातने तब्बल ३५६ धावांनी विजय मिळवत स्पर्धेत आपली ताकद दाखवली.

सामनावीर : महाराष्ट्र विरुद्ध मध्य प्रदेश : अभिजीत शिरोड

कर्नाटक विरुद्ध उत्तर प्रदेश : सागर एस

पश्चिम बंगाल विरुद्ध राजस्थान : प्रसनजीत अडक

गुजरात विरुद्ध चंदीगढ : अनिल गरिया

एकूणच, दृष्टीदोष असलेल्या खेळाडूंच्या या राष्ट्रीय टी-20 स्पर्धेला उत्कंठावर्धक सुरुवात झाली असून पुढील सामने अधिक रंगतदार होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मराठी चित्रपटसृष्टीत पहिल्यांदाच एआयचा जलवा!

पुणे (दै. संध्या) :

मराठी चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञानाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. प्रेक्षकांना खळखळून हसवणारा 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' हा चित्रपट सध्या सर्वत्र प्रदर्शित झाला असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मदनचा विनोदी अंदाज, चंदनची निरागसता, रतनचा ताठर स्वभाव आणि बबनचा खोडकरपणा प्रेक्षकांच्या मनात घर करत असतानाच आता या चित्रपटातील एक खास सरप्राईज प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. ते म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीतील पहिले एआय प्रमोशनल साँग! गौरव चाटी आणि आदित्य बेडेकर यांचे संगीत लाभलेल्या या गाण्याला विक्रम हिरनाईक यांनी शब्दबद्ध केले आहे. या खास गाण्याला अवधूत गुप्ते यांनी आवाज दिला असून ऐकायला जितके भन्नाट, तितकेच पाहायलाही हे गाणे जबरदस्त ठरत आहे. एआय तंत्रज्ञानाच्या सहाय्याने चित्रपटातील कलाकारांना नव्या, गोंडस आणि कल्पनारम्य रूपात सादर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे कुरळे ब्रदर्सचा साधेपणा आणि निरागसता एआयच्या माध्यमातून आणखी खुलून दिसत आहे. प्रेक्षकांना हा वेगळा प्रयोग खूपच भावत आहे. एआयमधील या गाण्याची संकल्पना आणि सादरीकरणाची जबाबदारी ईओडी मीडियाच्या पुष्कर आणि रश्मी यांनी समर्थपणे पेलली आहे. सोशल मीडियावर या गाण्याचे क्लिप्स मोठ्या प्रमाणावर शेअर होत असून रील्स, स्टेटस आणि कमेंट्समध्ये या गाण्याचीच चर्चा रंगली आहे. "मराठीतही असा प्रयोग होऊ शकतो याचा अभिमान वाटतो", "एआयमधील कलाकार खूपच क्यूट दिसत आहेत", "गाणं पुन्हा पुन्हा पाहावंसं वाटतंय" अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांकडून येत आहेत.

चित्रपटाची लोकप्रियता आणि या एआय गाण्याचा ट्रेंड यामुळे 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'ची क्रेझ आणखी वाढली आहे. विनोदाचा ठसका आणि तंत्रज्ञानाची जोड यामुळे हा चित्रपट आता वेगळ्याच पातळीवर पोहोचला आहे.

# पुण्यात हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील सुरक्षितता, अनुपालन आणि शाश्वत पद्धतींसाठी 'सक्षम' उपक्रमाची घोषणा

### एलनप्रोचा ज्ञानाधारित उद्योग उपक्रम; फूड सेफ्टी आणि ऑपरेशनल मानकांवर विशेष भर

पुणे (दै. संध्या) :

पुण्यातील फूड सर्व्हिस आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्र नव्या फॉरमॅट्समुळे वेगाने विस्तारत असताना सुरक्षित कार्यपद्धती, नियमांचे पालन आणि शाश्वत पायाभूत सुविधा यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर कमर्शियल रेफ्रिजरेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एलनप्रोने 'सक्षम' या ज्ञानाधारित उद्योग उपक्रमाच्या पुणे आवृत्तीची घोषणा केली. पत्रकार परिषदेत उपक्रमाचे उद्दिष्ट, उद्योगासाठीचे महत्त्व आणि अपेक्षित परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी एलनप्रोचे संचालक संजय जैन, हॉस्पिटॅलिटी कन्सल्टंट्स फोरमचे अध्यक्ष पी. श्रवण कुमार तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. तज्ज्ञांच्या मते, फूड व्यवसाय झपाट्याने वाढत असला तरी तापमान नियंत्रण, रेफ्रिजरेशन देखभाल आणि ऑडिट तयारी यांसारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये सातत्याचा अभाव दिसून येतो. यामुळे अन्नसुरक्षेचे धोके, अनावश्यक नुकसान आणि आर्थिक ताण वाढण्याची शक्यता असते.

'सक्षम' पुणे अंतर्गत शेफ, हॉटेल इंजिनिअर्स, फूड बिझनेस ऑपरेटर्स, फॅसिलिटी मॅनेजर्स आणि अनुपालन तज्ज्ञांसाठी मार्गदर्शित सत्रे आणि उद्योग संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. ही सत्रे प्रत्यक्ष कामकाजातील अडचणी व उपायांवर आधारित असतील.

- ▲ एकदिवसीय कार्यक्रमात तीन प्रमुख विषयांवर भर असेल
- ▲ फूड सेफ्टी आणि स्वच्छता अनुपालन तयारी
- ▲ शाश्वत हॉस्पिटॅलिटी संचालन

तापमान व्यवस्थापन, अन्नाच्या गुणवत्तेत रेफ्रिजरेशनची भूमिका, प्रिव्हेंटिव्ह मेंटेनन्स, किचन रिस्क कंट्रोल, ग्रीस व वेस्टवॉटर व्यवस्थापन, तसेच नियमांचे पालन न केल्यास होणारे आर्थिक परिणाम यावर सविस्तर चर्चा होणार आहे. पॅनेल चर्चांमधून उपकरणांची निवड आणि SOP चा सुरक्षिततेवर होणारा परिणामही स्पष्ट केला जाणार आहे.

संजय जैन म्हणाले, "फूड व्यवसाय मोठ्या प्रमाणात आणि वेगाने वाढत आहे. सुरक्षित व टिकाऊ वाढीसाठी मजबूत कार्यप्रणाली आणि योग्य तांत्रिक निर्णय अत्यावश्यक आहेत. 'सक्षम'चा उद्देश म्हणजे उद्योग मानके प्रत्यक्ष कामात कशी उतरवायची याचे व्यवहार्य मार्गदर्शन देणे." पी. श्रवण कुमार म्हणाले, "उद्योग वाढत असताना फूड सेफ्टी आणि अनुपालनाची मूलभूत समज अधिक मजबूत होणे गरजेचे आहे. 'सक्षम'सारखे ज्ञान मंच व्यावसायिक मानके उंचावण्यास मदत करतात."

पत्रकार परिषदेत हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, क्लाऊड किचन, फूड रिटेल आणि क्विक कॉमर्स डार्क स्टोअर्समध्ये अन्नसुरक्षा, ऑडिट अनुपालन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी कमर्शियल रेफ्रिजरेशन प्रणाली किती महत्त्वाची ठरत आहे, यावरही भर देण्यात आला. कंपनीकडून कोल्ड रूम्स, वापरानुसार डिझाइन केलेल्या कूलिंग सोल्यूशन्स आणि ऊर्जा बचत करणाऱ्या प्रणाली उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती देण्यात आली.




एलनप्रो बद्दल : २००९ मध्ये स्थापन झालेली एलनप्रो ही कमर्शियल रेफ्रिजरेशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी असून आधुनिक कूलिंग तंत्रज्ञान उद्योगात आणण्यावर तिचा भर आहे. HoReCa, फूड अँड बेव्हरेज रिटेल, फार्मास्युटिकल्स आणि हेल्थकेअर अशा विविध क्षेत्रांतील रेफ्रिजरेशन गरजांसाठी कंपनी सातत्याने उपाययोजना करत आहे. गुरुग्राम मुख्यालय असलेल्या एलनप्रोकडे देशभरात सुमारे ७०० चॅनल पार्टनर्सचे जाळे असून भारतीय हवामानानुसार विकसित केलेल्या उत्पादनांना उद्योगात विशेष मान्यता मिळाली आहे.

**'कूल स्किल्स ब्राइट फ्यूचर'द्वारे कौशल्य विकास**

एलनप्रोच्या 'कूल स्किल्स ब्राइट फ्यूचर' या कौशल्य विकास उपक्रमाची प्रगतीही यावेळी मांडण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत नवोदित तंत्रज्ञांना कमर्शियल रेफ्रिजरेशन आणि सुरक्षित कूलिंग पद्धतींबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत २०० हून अधिक तरुणांनी या उपक्रमाचा लाभ घेतला आहे. उद्योगासाठी प्रशिक्षित तांत्रिक मनुष्यबळ तयार करणे आणि रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करणे हा यामागील उद्देश आहे.

### थोडक्यात पण महत्वाचे...



## आजपासून पुण्यात 'लेन्सकेप केरळ' छायाचित्र प्रदर्शन

पुणे (दैनिक संध्या) : 'केरळ टुरिझम' तर्फे 'लेन्सकेप केरळ' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून सुरु होणाऱ्या या प्रदर्शनात दहा नामवंत छायाचित्रकारांनी संपूर्ण केरळमध्ये टिपलेल्या १०० निवडक छायाचित्रांचा संग्रह सादर केला जाणार आहे. केरळमधील लोकांचे वैविध्यपूर्ण जीवन, संस्कृती, निसर्गसौंदर्य, वन्यजीव आणि दैनंदिन क्षण अशा विविध विषयांना या प्रदर्शनात स्थान देण्यात आले आहे. दहा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून साकारलेले हे प्रदर्शन 'गॉड्स ओन कंट्री' म्हणजेच केरळचे एक चैतन्यमय आणि आधुनिक रूप प्रेक्षकांसमोर उभे करते. हे प्रदर्शन १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान सकाळी ११:०० ते रात्री ८:०० वाजेपर्यंत राजा रवि वर्मा गॅलरी, पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र, घोले रोड, शिवाजीनगर येथे असणार आहे या प्रदर्शनात प्रवेश विनामूल्य आहे. प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी (१९ फेब्रुवारी) प्रसिद्ध छायाचित्रकार सौरभ आनंद चॅटर्जी आणि बालन माधवन यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष 'फोटोग्राफी मास्टरक्लास' आयोजित केला जाईल.



## कॅरम स्पर्धेत पीसीपी मुलांचा सलग चौथ्यांदा विजय, मुलींचा सलग तिसऱ्यांदा विजय

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण आंतर पदविका विद्यार्थी स्पोर्ट्स असोसिएशन व राजगड टेक्निकल कॅम्पस पॉलिटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने डी - १ झोनल कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या (पीसीपी) मुलांच्या संघाने अंतिम फेरीत विजय मिळवला. या स्पर्धेत पुणे विभागातून एकूण १० महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. साखळी सामने, उपांत्य फेरी व अंतिम सामना या तीन टप्प्यात स्पर्धा झाली. पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या संघात आदेश ठाकरे, प्रसाद मोरे, सम्यक गवळी, शिवाजी पवार, अद्वित साळुंखे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या संघाने सलग चौथ्या वर्षी हा विजय मिळविला आहे. प्रा. राजू गायकवाड व सुनील गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या कॅरम स्पर्धेतील मुलींच्या संघाने देखील सलग तिसऱ्यांदा विजय मिळवून हॅट्रिक केली. विजेत्या संघामध्ये प्रतीक्षा लांडगे, सायली सुर्वे, प्रगती गोरे, कस्तुरी मानमोडे, सानिका बेदाडे यांचा समावेश होता. यांना गायत्री फाटे आणि मयुरी देशमुख यांनी मार्गदर्शन केले होते. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीपी प्राचार्या डॉ. विद्या बॅकॉड यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## हैदर आणि सोनाक्षी यांनी चाहत्यांचे आभार मानले!



पुणे (दैनिक संध्या) : 'जगद्धात्री' ही मालिका सध्या टेलिव्हिजनवरील सर्वाधिक लोकप्रिय मालिकांपैकी एक असून त्यातील मुख्य जोडी शिवाय (फर्मान हैदर) आणि जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) हे सध्या ' चाहत्यांनी या नव्या जोडीवर प्रेम आणि कौतुकाचा वर्षाव केला असून, अलीकडच्या काळात ही जोडी सर्वाधिक चर्चेत असलेली ऑनस्क्रीन जोडी बनली आहे. फर्मान हैदर आणि सोनाक्षी बत्रा यांनी '#Shivdhatri' या जोडीला मिळालेल्या प्रचंड प्रेम आणि पाठिंब्यासाठी प्रेक्षकांचे मनापासून आभार मानले आहेत. या जोडीला प्रेक्षकांनी इतक्या उत्साहाने स्वीकारल्याबद्दल त्यांनी चाहत्यांचे विशेष आभार व्यक्त केले असून त्यांच्या या पाठिंब्यामुळे हा ऑनस्क्रीन प्रवास आणखी खास झाला आहे. जगद्धात्रीची भूमिका साकारणारी सोनाक्षी बत्रा म्हणाली, शिवाय आणि जगद्धात्री या जोडीला प्रेक्षकांनी ज्या प्रेमाने साथ दिली आहे त्याबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे. ही दृश्ये साकारताना फर्मान हैदरच्या सततच्या पाठिंब्यामुळे काम करणे खूप सहज आणि सुरळीत झाले. तो खरोखरच अत्यंत प्रतिभावान कलाकार आहे आणि त्याच्यासोबत काम केल्याने शिवाय आणि जगद्धात्रीच्या प्रत्येक क्षणातील भावनाही अधिक खुलून येतात. आगामी कथानकात प्रेक्षकांनी खरोखर पाहण्यासारखी, खूप सुंदर आणि खास दृश्ये अनुभवायला मिळणार आहेत.

# पार्ले ॲग्रोचे 'स्मूध केसर बदाम' लाँच

## डेअरी बेव्हरेज पोर्टफोलिओमध्ये क्लासिक भारतीय फ्लेवरची भर




नवी दिल्ली (दै. संध्या) : भारतातील अग्रगण्य पेय कंपनी पार्ले ॲग्रोने आपल्या फ्लॅगशिप डेअरी बेव्हरेज ब्रँड 'स्मूध' अंतर्गत 'स्मूध केसर बदाम' हे नवीन उत्पादन लाँच केले आहे. बदामाची समृद्धता आणि केशरची ऊब यांचा संगम असलेला हा फ्लेवर्ड मिल्क पर्याय ग्राहकांना प्रीमियम आणि आल्हाददायक अनुभव देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आला आहे. स्मूधच्या फ्लेवर्ड मिल्क पोर्टफोलिओमध्ये क्लासिक केसर बदाम चव समाविष्ट करत ग्राहकांसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. बदामाचे गुणधर्म, केशरचा सुगंध आणि मऊ, क्रीमी दुधाचा मिलाफ स्मूधच्या खास शैलीत सादर करण्यात आला आहे. सण, कुटुंबीयांची भेट, संध्याकाळचा आस्वाद किंवा दिवसभरातील ताजेतवाने पेय म्हणून हे उत्पादन उपयुक्त ठरेल, असे कंपनीने म्हटले आहे. हे उत्पादन ८० मि.ली.साठी १० रुपये आणि १५० मि.ली.साठी २० रुपयांच्या किमतीत उपलब्ध आहे.

लाँचबाबत पार्ले ॲग्रोच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक व सीएमओ नादिया चौहान म्हणाल्या, "स्मूधने डेअरी-आधारित पेये अधिक सुलभ करत या श्रेणीला नवे रूप दिले आहे. केसर बदाम हा सांस्कृतिक महत्त्व असलेला आणि सर्वांना आवडणारा फ्लेवर असल्याने तो आमच्या पोर्टफोलिओमध्ये नैसर्गिक भर ठरला. या लाँचमुळे पारंपरिक स्वाद आधुनिक 'ऑन-द-गो' फॉरमॅटमध्ये ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे." स्मूध केसर बदाम शहरी आणि ग्रामीण बाजारपेठांमध्ये जनरल ट्रेड, मॉडर्न ट्रेड तसेच डिजिटल व क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर विविध पॅक स्वरूपात उपलब्ध होणार आहे. या लाँचला आउट-ऑफ-होम जाहिराती, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया, इन्फ्लुएंसर भागीदारी आणि इन-स्टोअर प्रमोशन अशा एकात्मिक मार्केटिंग मोहिमेचा पाठिंबा देण्यात येणार आहे. फ्लेवर्ड मिल्क विभागात ग्राहकांचा वाढता कल लक्षात घेऊन पार्ले ॲग्रोने हा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. सध्या स्मूध ब्रँडअंतर्गत चॉकलेट, चॉकलेट हेझलनट, टॉफी कॅरामल आणि नव्याने लाँच केलेले केसर बदाम असे विविध फ्लेवर्स उपलब्ध आहेत. फ्लेवर्ड मिल्क व लस्सी विभागात कंपनीची उपस्थिती सातत्याने वाढत असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले. पार्ले ॲग्रो ही भारतातील प्रमुख पेय कंपनी असून फ्रूट ज्युस आधारित पेये, स्पार्कलिंग ड्रिंक्स, पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, कार्बोनेटेड पेये आणि डेअरी उत्पादने अशा विविध श्रेणींमध्ये कंपनीची उत्पादने उपलब्ध आहेत. देश-विदेशातील ८४ उत्पादन सुविधा आणि १.९ दशलक्षाहून अधिक विक्री केंद्रांमार्फत कंपनीची सेवा पोहोचत आहे. 'फ्रूटी', 'ॲप्पी', 'ॲप्पी फिझ्झ', 'बी फिझ्झ', 'स्मूध', 'बेली' आदी ब्रँड्ससह पार्ले ॲग्रो नवकल्पनांवर आधारित वाढ साधत असल्याचे कंपनीने नमूद केले.

## HCL फाउंडेशनने दृष्टिदोष असलेल्या लोकांसाठी राष्ट्रीय T20 स्पर्धेला दिला पाठिंबा

पुणे (दै. संध्या) : भारतामध्ये HCLTech च्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचे उपक्रम चालवणारी HCLFoundation, 15 ते 19 फेब्रुवारी 2026 दरम्यान पुण्यात होणाऱ्या दृष्टिहीनांसाठीच्या राष्ट्रीय T20 स्पर्धेला पाठिंबा देत आहे. पुणे ब्लाइंड मेन्स असोसिएशन (PBMA) आणि ब्लाइंड क्रिकेट असोसिएशन (BCA) यांनी आयोजित केलेल्या या स्पर्धेमुळे दृष्टिहीन क्रिकेटपटूंना आपली प्रतिभा दाखवण्यासाठी राष्ट्रीय व्यासपीठ मिळत आहे, तसेच विविध समुदायांमध्ये सर्वसमावेशक खेळांना प्रोत्साहन मिळत आहे. महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि पंजाब या राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे एकूण आठ संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतील सामने डेक्कन जिमखाना मैदान आणि पद्मावती येथील टेंबेकर मैदानावर खेळले जात आहेत. महाराष्ट्र दृष्टिहीन क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष मा. श्री. रवी वाघ म्हणाले, "2011 मध्ये सुरुवात झाल्यापासून T20 ब्लाइंड क्रिकेट स्पर्धेने मोठी प्रगती केली आहे, पुण्यातील राज्यस्तरीय स्पर्धेपासून ती आता राष्ट्रीय स्तरावर ओळखली जाणारी स्पर्धा बनली आहे, ज्यामध्ये अनेक राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन झाले आहे—यामध्ये वर्ल्ड कप लीग सामने आणि राष्ट्रीय संघ निवड चाचण्यांचाही समावेश आहे. ही स्पर्धा पुढे आणखी मोठी आणि यशस्वी होईल, अशी आम्हाला आशा आहे." पुणे दृष्टिहीन पुरुष संघटनेचे (PBMA) अध्यक्ष मा. श्री. राजेश शाह म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून, ब्लाइंड क्रिकेट असोसिएशनने दि पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशनच्या सहकार्याने समावेशक खेळांना सातत्याने प्रोत्साहन दिले आहे.

## टिएटोच्या सहकार्याने डिजिटल व उत्पन्न क्षमतांना बळ

### नॅसकॉम फाउंडेशनचा उपक्रम; पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये प्रशिक्षण

पुणे (दै. संध्या) : ग्रामीण महिला उद्योजकांना डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्षम करण्यासाठी नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोच्या सहकार्याने २५० महिलांना प्रशिक्षण दिले. या उपक्रमाचा उद्देश त्यांच्या व्यावसायिक क्षमता मजबूत करणे आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून उत्पन्नवाढ साधणे हा होता.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर या भागांमध्ये राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाद्वारे हस्तकला, हातमाग, उत्पादन व प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात आले. ५० तासांच्या प्रशिक्षक-नेतृत्वाखालील प्रशिक्षणातून सहभागी महिलांनी डिजिटल व आर्थिक साक्षरता, ऑनलाइन पेमेंट, सोशल कॉमर्स, डिजिटल मार्केटिंग, ई-अकाउंटिंग आणि सरकारी योजनांविषयी माहिती अशी कौशल्ये आत्मसात केली.

नॅसकॉम फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी ज्योती शर्मा म्हणाल्या, "डिजिटल सक्षमीकरणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबन वाढते. या सहकार्यामुळे २५० महिला उद्योजकांना डिजिटल साधनांचा वापर करून उत्पन्ननिर्मिती, बाजारपेठेत प्रवेश आणि व्यवसाय निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे शक्य झाले आहे."

टिएटो इंडियाचे संचालक व फायनान्स ऑपरेशन्स प्रमुख अश्वनी बत्रा यांनी सांगितले, "तंत्रज्ञान व्यावहारिक आणि सर्वसमावेशक असेल तरच त्यातून खरे मूल्य निर्माण होते. या उपक्रमाद्वारे ग्रामीण महिला उद्योजकांना पेमेंट, मार्केटिंग आणि व्यवसाय व्यवस्थापनासाठी डिजिटल साधनांचा आत्मविश्वासाने वापर करता येत आहे."

प्रशिक्षणानंतर महिलांमध्ये डिजिटल साधनांचा वापर लक्षणीयरीत्या वाढल्याचे दिसून आले. ९० टक्क्यांहून अधिक महिला डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म वापरत आहेत, तर ८६ टक्क्यांहून अधिक महिला स्वतःचे व्यवसाय व्यवहार स्वतंत्रपणे व्यवस्थापित करत आहेत. स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वापरामुळे ग्राहकांशी थेट संपर्क साधणे व सोशल मीडियाद्वारे व्यवसायाचे प्रमोशन करणे अधिक सोपे झाले आहे.

या उपक्रमामुळे जवळपास निम्म्या महिला उद्योजकांच्या मासिक उत्पन्नात वाढ झाली असून सामाजिक वाणिज्य प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून विक्रीतही वाढ झाली आहे. औपचारिक बँकिंग सेवा, एटीएम कार्ड वापर आणि डिजिटल बुककीपिंगचा स्वीकार वाढल्याने व्यवसाय अधिक संघटित व शाश्वत होत असल्याचेही निदर्शनास आले. ग्रामीण भागातील महिलांना तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक कौशल्ये देत हा उपक्रम डिजिटल दरी कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत असल्याचे नॅसकॉम फाउंडेशनने नमूद केले.

## सपना ठाकूर यांनी 'रीटा' भूमिकेसाठी बनारसी बोलीभाषा आत्मसात केली



मुंबई (दै. संध्या) : एण्ड टीव्हीवरील अलौकिक शक्तीवर आधारित विनोदी मालिका 'घरवाली पेडवाली' प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली असून कथानकात नवे रंग भरत अभिनेत्री सपना ठाकूर 'रीटा'ची भूमिका साकारत आहेत. या भूमिकेसाठी त्यांनी विशेष मेहनत घेत बनारसी बोलीभाषा आत्मसात केली आहे. चंदीगडमध्ये वाढलेल्या सपना ठाकूर यांच्यासाठी बनारसच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीतील पात्र साकारणे हे आव्हानात्मक होते. वाराणसीच्या संस्कृतीत मिसळलेल्या रीटाच्या व्यक्तिमत्त्वाला न्याय देण्यासाठी त्यांनी उच्चार, भाषाशैली आणि देहबोली यामध्ये मोठा बदल केला.

आपल्या अनुभवाबद्दल सांगताना सपना ठाकूर म्हणाल्या, "रीटाची भूमिका साकारणे माझ्यासाठी अत्यंत उत्साहवर्धक अनुभव ठरला. माझी नैसर्गिक बोलीभाषा बनारसमधील लोकांपेक्षा वेगळी असल्याने मला संवाद, भाषेचा गोडवा आणि स्थानिक शैली आत्मसात करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. प्रत्येक संवाद वास्तववादी आणि संस्कृतीशी जोडलेला वाटावा यासाठी मी सतत सराव केला."

त्या पुढे म्हणाल्या, "बनारसची संस्कृती अत्यंत समृद्ध आहे. तेथील लोकांची बोलण्याची पद्धत, हावभाव आणि भावना व्यक्त करण्याची शैली समजून घेण्यासाठी मी अनेक व्हिडिओ पाहिले तसेच स्थानिक लोकांशी संवाद साधला. या भूमिकेमुळे मी माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर पडले आणि पूर्णपणे वेगळे व्यक्तिमत्त्व साकारण्याचा अनुभव घेतला."

'घरवाली पेडवाली' मालिकेत रीटा पांडेची भूमिका साकारताना सपना ठाकूर प्रेक्षकांसमोर एक साधी, परंपरागत आणि मनमिळावू व्यक्तिरेखा उभी करत आहेत.

ही मालिका दर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता एण्ड टीव्हीवर प्रसारित होते, तसेच सर्व भाग हिंदी झी5वरही पाहता येतात.

## तारकासुराच्या अग्नी आणि रोषाला आत्मसात केले



नवी दिल्ली (दै. संध्या) : सोनी सबवरील गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय हा शो शिव परिवाराच्या अद्भुत कथा, त्यांचा विश्वास, कर्तव्य आणि दिव्य उद्देश यांना जिवंत करतो. कथा आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचली आहे, जिथे तारकासुराचा प्रवेश होतो. हा शक्तिशाली पात्र प्रसिद्ध अभिनेता आमिर दलवी साकारत आहेत. तारकासुर ही अशी शक्ती आहे जी केवळ बल किंवा युक्तीने पराभूत होऊ शकत नाही, तर फक्त सर्वोच्च दिव्य ज्ञानानेच हरवली जाऊ शकते. त्याचा प्रवेश कथेत मोठा बदल घडवतो आणि एक गहन आध्यात्मिक व भावनिक संघर्षाची सुरुवात करतो. पुराणकथेनुसार, तारकासुराने कठोर तप करून भगवान ब्रह्मा यांना प्रसन्न केले. ब्रह्मांनी त्याला जवळजवळ अजेय असा वर दिला की त्याचा वध फक्त भगवान शिवाच्या पुत्राच्या हातूनच होऊ शकतो. या वरदानाच्या जोरावर त्याने तीनही लोकांवर राज्य करण्याचा निर्धार केला आणि तो निडर झाला. हळूहळू त्याचा आत्मविश्वास हुकूमशाहीत बदलला आणि त्याच्या विरोधकांचा विश्वास डळमळू लागला. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना आमिर दलवी म्हणाले, "तारकासुरासारख्या शक्तिशाली आणि अनेक स्तर असलेल्या पात्रात शिरणे माझ्यासाठी भावनिक आणि शारीरिक दोन्ही प्रकारे आव्हानात्मक होते. तो फक्त राक्षस नाही, तर महत्वाकांक्षा आणि बंडखोरीचे प्रतीक आहे. मला सर्वात जास्त आकर्षित केलेली गोष्ट म्हणजे त्याचा अढळ विश्वास की त्याला कोणीही हरवू शकत नाही. त्या भावनेला धरून ठेवणे खूप ताकदवान अनुभव होता, कारण त्याचा आत्मविश्वास हळूहळू अहंकारात बदलतो आणि तो बदल सर्व काही बदलून टाकतो. जेव्हा मी पूर्ण पोशाख आणि कवच घालून सेटवर पाऊल ठेवले, तेव्हा सगळ्यांच्या नजरा माझ्यावर खिळल्या आणि त्या क्षणी माझी ऊर्जा पूर्णपणे बदलली." तारकासुराच्या आगमनाने गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय आता एका गहन आणि आध्यात्मिक अध्यायाकडे वाटचाल करत आहे, जो चांगले आणि वाईट यांच्यातील शाश्वत संघर्ष दाखवेल.

## टीओडी वीजमीटरमुळे पुणेकरांना मिळाली साडेआठ कोटींची सवलत

पुणे (दै. संध्या) : टीओडी वीजमीटर बसविणाऱ्या वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या काळातील दिवसा वीजवापरावर ८० पैसे प्रतियुनिट सवलत दिली जाते. या सवलतीपोटी जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ ह्या कालावधीत पुणेकरांना ८ कोटी ६० लाखांचा फायदा झाला असून, त्यांच्या दरमहाच्या वीजबिलात ही सवलत जमा झाली आहे. स्मार्ट/टीओडी वीजमीटर मोफत बसविले जात असून, ग्राहकांनी मीटर बसविण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून केले जात आहे. महावितरण पुणे परिमंडलात वीजग्राहकांची संख्या ३९ लाख ७१ हजार इतकी असून, त्यापैकी ९ लाख ८४ हजार ग्राहकांना अत्याधुनिक टीओडी वीजमीटर बसविण्यात आले आहे. तर उर्वरित ग्राहकांना हे अत्याधुनिक मीटर लवकरच बसविले जात आहे. वीजमीटर बसविण्याची सुरुवात महावितरणने स्वत:पासून केली. महावितरणच्या सर्व आस्थापना व कर्मचारी वसाहतींना हे मीटर लावण्यात आले आहे. त्यापाठोपाठ सर्व सरकारी कार्यालये, शासकीय वसाहती आदींनाही हे मीटर बसविले आहे. हे मीटर पूर्णत: मोफत असून, त्यासाठी महावितरणकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. महावितरणला लागणाऱ्या विजेत दिवसेंदिवस सौरऊर्जेचा वाटा वाढत आहे. ही वीज दिवसा मिळत असून, इतर विजेच्या तुलनेत स्वस्त आहे. ह्या स्वस्त विजेचा फायदा महावितरण ग्राहकांना आकारल्या जाणाऱ्या वीज दरावर प्रतियुनिट ८० पैसे प्रमाणे देते. पुढील काळात ही सवलत १ रुपया प्रति युनिटपर्यंत जाणार आहे.

## ब्रिंदा त्रिवेदीचा जबरदस्त रूपांतर : भूमिकेसाठी तिने पुरुष वेश धारण केला

नवी दिल्ली (दै. संध्या) : सोनी सब वरील 'पुष्पा इम्पॉसिबल' हा शो आपल्या प्रेरणादायी कथेसाठी आणि सहजपणे जोडल्या जाणाऱ्या पात्रांसाठी प्रेक्षकांचा आवडता ठरला आहे. या शोमध्ये पुष्पा (करुणा पांडे) हिची ताकद आणि भावनिक तसेच कठीण परिस्थितींमध्ये तिचा चिकाटीने लढा दाखवला जातो. पुष्पाची हुशार आणि मजबूत प्रतिस्पर्धी कदंबरी (ब्रिंदा त्रिवेदी) नेहमीच तिच्यापेक्षा एक पाऊल पुढे राहण्यासाठी नवे मार्ग शोधत असते. अलीकडेच कदंबरीला पुरुष वेशात पाहिले गेले, जेव्हा तितली (भूमी रामोला) च्या कस्टडीच्या लढाईने नवा टप्पा गाठला. या नव्या लूकने कथानकात अनपेक्षित वळण आणले आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली. ब्रिंदा त्रिवेदी यांनी सांगितले की कदंबरीचे पात्र साकारण्यासाठी तीव्र तयारी आणि पात्राच्या तीक्ष्ण व रणनीतिक विचारसरणीचे स्पष्ट आकलन आवश्यक आहे. अलीकडील भागांमध्ये, जिथे कदंबरी तितलीचे अपहरण करते जेणेकरून कस्टडीच्या लढाईत वरचढ राहता येईल, तिथे ती संशय टाळण्यासाठी आणि नजरेत न येता पळून जाण्यासाठी पुरुष वेश धारण करते. हा वेश तिच्या मोठ्या योजनेचा विचारपूर्वक भाग ठरतो, विशेषतः जेव्हा पोलिसांची नाकाबंदी कडक होते. हा रूपांतरण विश्वासार्ह वाटावा यासाठी ब्रिंदाने चाल-ढाल, आवाजाचा स्वर, हावभाव आणि संयमित अभिव्यक्तींवर विशेष लक्ष दिले, ज्यामुळे कदंबरीची चलाख उपस्थिती वेश बदलल्यानंतरही कायम राहिली. कॉस्ट्यूम बदलाबद्दल बोलताना ब्रिंदा त्रिवेदी म्हणाल्या, "कदंबरीला पुरुष वेशात साकारणे माझ्यासाठी पूर्णपणे वेगळा अनुभव होता. मला हे फक्त कॉस्ट्यूम बदलल्यासारखे वाटू नये असे वाटले, म्हणून मी पुरुषांच्या सवयींचे निरीक्षण केले आणि माझा आवाज जड करण्यावर, हातवारे कमी करण्यावर आणि चालण्याच्या पद्धतीत बदल करण्यावर काम केले. प्रत्येक भूमिकेसोबत मी एक अभिनेत्री म्हणून काहीतरी नवीन शिकते, आणि या भूमिकेने मला खरोखरच माझ्या आराम क्षेत्राबाहेर ढकलले. खरं तर, शूटिंगच्या दिवशी काही कलाकार आणि क्रू सदस्यांनी मला लगेच ओळखले नाही, जे माझ्यासाठी मोठे कौतुक होते." पाहा 'पुष्पा इम्पॉसिबल', दर सोमवार ते शनिवार रात्री 9:30 वाजता, फक्त सोनी सब वर.



**जेजुरी नगरपरिषद, जेजुरी ता. पुरंदर जि.पुणे**

ईनिविदा

ई-निविदा सूचना क्रमांक, jejurimc/Civil/०२/२०२६

जेजुरी नगरपरिषद कार्यालय
जा.क्र. जेनपा/कावि/ ३०५/२०२६.
दिनांक:- १७/०२/२०२६

जेजुरी नगरपरिषद करीता ई निविदा सूचना क्रमांक, jejurimc/Civil/०२/२०२६ ई-निविदा पध्दतीने मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा दिनांक १८/०२/२०२६ रोजी सकाळी ११.००वा. पासून भरण्यास उपलब्ध आहे. याबाबतचे शुध्दी पत्रके महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहण्यास / भरण्यास उपलब्ध आहे.

शिक्का

सही/-
(चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खा. श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

पिंपरी (दैनिक संध्या) : मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शहरातील गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. आता पायपीठ थांबणार असून सायकलवर शाळेत जाता येणार असल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. या प्रसंगी महापालिकेतील शिवसेनेचे गटनेते विश्वजित बारणे, नगरसेवक निलेश बारणे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, बाळासाहेब ओव्हाळ, धनाजी बारणे, धनाजी विनोदे, शांताराम भोंडवे, नंदू जाधव, माऊली घोगरे, बाळासाहेब वाघमोडे उपस्थित होते. खासदार श्रीरंग बारणे यांचा वाढदिवस दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. समाजातील गरजवंताचा शोध घेऊन त्यांना विविध माध्यमातून मदत केली जाते. विद्यार्थ्यांना शालेय मदत करण्यासाठी खासदार बारणे यांचा नेहमी आग्रह असतो. त्यातूनच यंदा शहरातील शाळेत पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेतला. त्यांची शाळेत जाण्याची अडचण ओळखून सायकल वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शहरातील गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनींना  सायकलचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आता विद्यार्थ्यांची पायीपीठ थांबणार असून सायकलवर शाळेत जाता येणार आहे. वेळेत सायकलवर जाता येईल. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा दिवस नसतो, तर समाजाला काहीतरी परत देण्याची संधी आहे. याच भावनेतून वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. शिक्षणासाठीचे प्रत्येक पाऊल सोपे व्हावे, वेळ वाचावा आणि स्वप्नांच्या दिशेने त्यांची वाट अधिक वेगाने पुढे जावी. विद्यार्थ्यांच्या प्रगतीतच आपला खरा आनंद आहे.



### पिंपळे गुरवमध्ये गोदामांना भीषण आग; शॉर्ट सर्किटमुळे लाखो रुपयांचे नुकसान

पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : पिंपळे गुरव येथील भाऊ नगर परिसरातील विश्वकर्मा मंदिराजवळ काल चार गोडाऊनला अचानक आग लागल्याची घटना घडली. ही आग पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पथकाने तात्काळ नियंत्रणात आणली. या घटनेत एक फर्निचर दुकान पूर्णतः जळून खाक झाले असून लाखों रूपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्र, भोसरी उप अग्निशमन केंद्र , तळवडे उप अग्निशमन केंद्र, चोवीसावाडी उप अग्निशमन केंद्र आणि रहाटणी उप अग्निशमन केंद्र येथील पाच पथके गाड्यांसह घटनास्थळी दाखल झाली. भाऊ नगर परिसरातील चिंचोळ्या बोळींमुळे अग्निशमन वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या. मात्र, अग्निशमन विभागाच्या जवानांनी अवघ्या वीस मिनिटांत आग नियंत्रणात आणली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून, मोठी दुर्घटना टळली आहे. अग्निशमन विभागाच्या तत्पर आणि समन्वयपूर्ण कार्यामुळे आग इतरत्र पसरण्यापासून रोखण्यात यश आले. दरम्यान, अशा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन विभागाच्या १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पिंपरीत पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी ‘बुस्टर पंप’ बसवा

■ राष्ट्रवादीचे नगरसेवक डब्बू आसवानी यांची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी प्रभाग क्र. २१ मधील विविध परिसरांमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीपुरवठ्याचा दाब अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः उंच भागावर व जलवाहिनीच्या शेवटच्या टोकावर असलेल्या घरांमध्ये पाणी पोहोचत नसल्याने पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक डब्बू आसवानी यांनी पाणीपुरवठा विभागाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, कमी दाबामुळे उंचावरील घरांमध्ये पाणी चढत नाही, अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, आणि वारंवार तोंडी तक्रारी करूनही समस्येचे कायमस्वरूपी निवारण झालेले नाही. या समस्येवर तांत्रिक उपाय म्हणून संबंधित ठिकाणी मोठ्या क्षमतेचा ‘बुस्टर पंप’ बसवण्यात यावा, जेणेकरून शेवटच्या घरांपर्यंत पुरेशा दाबाने पाणी पोहोचू शकेल, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच हे काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी पिंपरी चिंचवड महापालिका पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांच्याकडे करण्यात आली आहे. दरम्यान, नागरिकांनीही प्रशासनाने तातडीने कारवाई करून पाणीपुरवठ्याची समस्या मार्गी लावावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### शिवजयंती निमित्त मोफत महाआरोग्य व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

भोसरी (दैनिक संध्या) : भोसरी येथील नव महाराष्ट्र तरुण मंडळाच्या वतीने शिवजयंती निमित्त गुरुवार दि.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लांडेवाडी येथे भव्य महाआरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० ते सायं. ५ वाजेपर्यंत हे शिबिर सर्व नागरिकांसाठी खुले राहणार आहे. या शिबिराचे आयोजन नगरसेवक विराज लांडे व माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांनी केले आहे. या शिबिरात मोफत डोळे तपासणी, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, ऑर्थोपेडिक व जनरल शस्त्रक्रिया, महिलांच्या स्तनाची कर्करोग तपासणी, दंतरोग तपासणी, किमोथेरपी व रेडिएशन संदर्भातील मार्गदर्शन, कान-नाक-घसा तपासणी व शस्त्रक्रिया तसेच मोफत डायलिसिस सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय ब्लड प्रेशर, ब्लड शुगर आणि ईसीजी तपासणीही मोफत केली जाणार असून आवश्यक शस्त्रक्रिया अत्यल्प दरात करून देण्यात येणार आहेत.

# आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नाते घट्ट : महापौर रवि लांडगे

## घुमान पंजाबच्या ५ दिवसीय अभ्यास दौऱ्यातील संतपीठाच्या सदस्यांचा महानगरपालिकेच्यावतीने सन्मान

पिंपरी (दै. संध्या) :

शिख संप्रदायाचा धर्मग्रंथअसलेल्या गुरु ग्रंथ साहिब मध्ये संत परंपरेतील अनेक संतांच्या वाणीसह संत नामदेव यांच्या अभंगांचा समावेश आहे, ही बाब महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यातील आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नाते घट्ट करणारी आहे. भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देणारा हा सांस्कृतिक वारसा दोन्ही राज्यांना एका सूत्रात बांधतो आणि राष्ट्रीय एकात्मतेचे सुंदर उदाहरण ठरतो. दोन्ही राज्यातील संतांच्या विचारांतून प्रेरणा घेत आपण समाजात ऐक्य, बंधुता आणि सद्भावना अधिक दृढ होत आहे. ही अमूल्य परंपरा जपणे, तिची जोपासना करणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी संतपीठाच्या माध्यमातून घुमान येथील अभ्यास दौरा मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या वतीने संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी वास्तव्य केलेल्या घुमान, पंजाब येथे नुकताच संतपीठाच्या माध्यमातून ५ दिवसीय अभ्यास दौरा पार पडला. या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी १८ सदस्यांचा दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त तथा संतपीठाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप खोत, महापालिकेच्या शिक्षणाधिकारी तथा संतपीठाच्या सचिव संगीता बांगर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, संतपीठच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक हभप राजु महाराज ढोरे, संतपीठाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे, चिंतन समिती सदस्य ज्ञानेश्वर भांगरे, संगीत शिक्षक महेश शेळके, अविनाश भोगील, चंद्रकांत गोसावी,विलास कोकाटे , मराठी शिक्षिका मंगल अंबरे, विज्ञान शिक्षक अर्चना देसाई, सुचेता पुजारी, कला शिक्षिका मुग्धा शिरोडकर, पूर्णिमा इंगळे आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महापालिका संचलित जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या वतीने संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी वास्तव्य केलेल्या पंजाब घुमान येथे नुकताच संतपीठाच्या माध्यमातून ५ दिवसीय अभ्यास दौरा पार पडला. या अभ्यास दौऱ्यामध्ये  महापालिकेचे उपायुक्त संदीप खोत,  शिक्षणाधिकारी तथा संतपीठाच्या सचिव संगीता बांगर, संतपीठच्या संचालिका डॉ. स्वाती मुळे, संचालक हभप राजु महाराज ढोरे, संतपीठाचे प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गाडगे यांच्या सह भाषा विषय, समाजशास्त्र विषय, संगीत विषय तसेच कला विषयाच्या शिक्षिका, कार्यालयीन सहाय्यक अनिकेत भरत चासकर व अखिल नवनाथ पोखरकर अभ्यास दौऱ्यात समावेश होता.

सदर अभ्यास दौऱ्यादरम्यान घुमान इंटरनॅशनल पब्लिक स्कुल, बाबा नामदेवजी गव्हर्नमेंट डिग्री कॉलेज, बाबा आया सिंग रिअरकी कॉलेज या ठिकाणी भेटी दिल्या.

घुमान येथील संत नामदेव महाराज मंदिरामध्ये संतपीठाचे संचालक हभप राजू महाराज ढोरे यांचे संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या “तु अगाध वैकुंठनायका | तेरे चरणो मेरा माथा ||” या अभंगावर किर्तन संपन्न झाले. या अभंगाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे सांप्रदायचे दृष्टांत देत अभंगाच्या प्रत्येक चरणाचा अर्थ स्पष्ट केला. संत शिरोमणी नामदेवरायांच्या मंदिरात महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायिक परंपरेनुसार प्रथमच हिंदी किर्तन सेवा पार पडली. या अगोदर घुमान मध्ये संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या मंदिरासमोर 1970 साली हभप ज्ञानेश्वर माऊली देहूकर-पंढरपूर फड यांनी सप्ताह केला होता. त्यानंतर महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायिक परंपरेनुसार प्रथमच मुळ मंदिरातील ही किर्तनसेवा संतपीठाकडे आली आणि ती किर्तन सेवा संतपीठाचे संचालक हभप राजु महाराज ढोरे यांच्या माध्यमातून हिंदी भाषेत किर्तन करून पार पडली.

## खराळवाडीत वासुदेव लोककलेचे दुर्मिळ दर्शन

खराळवाडी (दै. संध्या) :

टिल्लम टिल्लम ताल वाजतो, मुखी हरिचे नाम गर्जतो, टिल्लम टिल्लम प्रभातकाली थय थय करीत स्वारी आली... असे म्हणत पहाटे तांबडं फुटता दारात उभा राहून सर्वांना झोपेतून जागवणारे वासुदेव बदलत्या युगात नामशेष होत चालले आहेत. अशातच सकाळच्या वेळेला तुकानामाचा गजर करीत भक्तिभावाच्या गजरामधून भक्तीचा परामर्थाचा वसा जपणाऱ्या वासुदेवाचे दर्शन खराळवाडी येथील नागरिकांना होत आहे. प्रकाश पवार हे वासुदेव लोककलावंत आहेत. त्यांनी सांगितले की, वासुदेव लोककलावंत दुर्मिळ झाल्याने समाजातील पारंपरिक व आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व हरवल्यासारखे जाणवत आहे. मराठी मुलखात वासुदेव हा शहरात सकाळच्या वेळी विठ्ठलाचे अभंग व गवळण गात दान मागणारा लोककलावंत आहे. मराठी संस्कृतीतील वासुदेवांची परंपरा सुमारे एक हजार ते बाराशे वर्षे जुनी आहे. पूर्वी अंगणात वासुदेव आला म्हणजे सौभाग्याची गोष्ट मानली जात असे. कारण वासुदेवाच्या रूपाने श्रीकृष्ण घरी आल्याचा आनंद त्या कुटुंबीयांना होत होता. त्याचे दर्शन घडले की लहान मुले आनंदाने नाचत होते. घरातील महिला सुपातून तांदूळ किंवा धान्य दान करत होत्या.

## ‘सारथी पोर्टल’ दोन महिन्यांपासून बंद, तातडीने पोर्टल सुरू करा

पिंपरी (दै. संध्या) :

■ नगरसेवक विनोद नढे यांची महापालिका आयुक्तांकडे मागणी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे ‘सारथी’ (System for Assistance to Residents and Tourists through Helpline Information) हे पोर्टल/वेबसाइट गेल्या दोन महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांना विविध सेवा व तक्रार नोंदणीसाठी मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर माजी विरोधी पक्षनेते नगरसेवक विनोद नढे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदन सादर करून तातडीने पोर्टल सुरू करण्याची मागणी केली आहे.




विनोद नढे यांनी निवेदनात म्हटले आहे की, ‘सारथी’ पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे नागरिकांना महापालिकेच्या विविध विभागांशी संबंधित माहिती मिळत होती. तसेच तक्रारी ऑनलाइन नोंदविण्याची सोय उपलब्ध होती. मात्र हे पोर्टल दीर्घकाळ बंद असल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होत असून तक्रारींच्या निराकरणालाही विलंब होत आहे.

विनोद नढे यांनी प्रशासनाकडे काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. पोर्टल बंद असण्यामागील तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणे काय आहेत, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी कोणत्या विभागाकडे किंवा बाह्य कंपनीकडे आहे, तसेच बंद कालावधीत नागरिकांच्या तक्रारी कोणत्या माध्यमातून स्वीकारल्या जात आहेत, याबाबत स्पष्टता देण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच, भविष्यात अशा प्रकारे प्रणाली बंद पडू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. डिजिटल सेवांसाठी मोठा निधी खर्च होत असताना नागरिकांना अखंडित सेवा मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. महापालिका प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन ‘सारथी’ पोर्टल लवकरात लवकर कार्यान्वित करावे आणि संबंधित जबाबदारांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी विनोद नढे यांनी केली आहे.

## मोहननगर- काळभोर नगर, आकुर्डी परिसरात गढूळ पाणी पुरवठा

### तात्काळ उपाययोजना करण्याची माजी नगरसेविका मिनल यादव यांची मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

मोहननगर- काळभोर नगर, आकुर्डी परिसरात गेल्या सात ते आठ दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. दूषित पाण्यामुळे अनेक नागरिक आजारी पडले असून काहींना रुग्णालयात दाखल करावे लागत असल्याने तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी माजी नगरसेविका मिनल यादव यांनी केली आहे.





मोहननगर- काळभोर नगर, आकुर्डी परिसरात गेल्या सात ते आठ दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये घसा दुखणे, पोटदुखी, जुलाब यासारख्या तक्रारी वाढल्या असून लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांवर त्याचा विशेष परिणाम होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर माजी नगरसेविका मिनल यादव यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. परिसरातील पाणीपुरवठा तातडीने तपासून स्वच्छ पाणी पुरवठा सुरू करावा, तसेच पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवून अहवाल जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, आयुक्त सध्या नागपूर येथे असल्याने त्यांनी दूरध्वनीवरून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्वरित तोडगा काढण्याचे आणि आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती माजी नगरसेविकांनी दिली. परिसरातील नागरिकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून स्वच्छ पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मिनल यादव यांनी दिला आहे.

## महाशिवरात्रीनिमित्त गंगा आरती व गंगाकलश स्नान उत्साहात संपन्न

निगडी (दै. संध्या) :

महाशिवरात्रीनिमित्त श्री केदारेश्वर मंदिर प्रांगण, पेठ क्रमांक २४, लोकमान्य हॉस्पिटलच्या मागे, निगडी प्राधिकरण येथे रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी गंगा आरती आणि गंगाकलश स्नान शिवभक्तांच्या साक्षीने भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. या कार्यक्रमाला विधानपरिषद उपसभापती अण्णा बनसोडे, नगरसेविका शैलजा मोरे, सामाजिक कार्यकर्त्या वर्षा देशपांडे, श्री केदारेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजू मोरे तसेच सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत उर्फ बाळा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. काशी विश्वेश्वर येथील विद्वान पंडित हिमांशू पांडे आणि गगन भार्गव यांच्या पौरोहित्यानुसार सायंकाळी ७.१५ वाजता गंगा आरती तर रात्री ८.०० वाजता गंगाकलश स्नान विधी पार पडला. शंखनाद व घंटानादाच्या मंगल ध्वनीत श्रीगणेश पूजन, शिवस्तुती, शिवस्तवन तसेच धूप, दीप व कर्पूर आरतीने श्री केदारेश्वराची महाआरती करण्यात आली. उपस्थित भाविकांनी पुष्पवृष्टी करत हर हर महादेवच्या जयघोषात परिसर दुमदुमून सोडला. महाशिवरात्री २०२६ महोत्सवानिमित्त रविवारी पहाटे ५ वाजल्यापासून सोमवारी पहाटे ५ वाजेपर्यंत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# धर्मवीर संभाजी महाराजांच्या शौर्यस्मृती जागवण्यासाठी ‘बलिदान मास’


## हिंदुभूषण स्मारक ट्रस्टतर्फे नियोजन

पिंपरी (दै. संध्या) :

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मरणार्थ दरवर्षी साजरा होणारा बलिदान मास यावेळी १८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने पाळण्यात येणार आहे. तसेच, शिव-शंभू विचारांची पिढी घडवण्यासाठी जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील नवनिर्वाचित नगरसेवक आणि आजी-माजी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बलिदान मास जनजागृतीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे, महापौर रवि लांडगे यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. बैठकीत कार्यक्रमांचे नियोजन, जनजागृती मोहिमेची रूपरेषा आणि युवकांसाठी प्रेरणादायी उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा झाली.

फाल्गुन अमावस्येला (इ.स. १६८९) संभाजी महाराजांनी मुघल बादशाह औरंगजेबाच्या कैदेत अमानुष छळ सहन करत स्वराज्य आणि धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. संगमेश्वर येथील सरदेसाईंच्या वाड्यात पकडल्यापासून ते भिमा-भामा-इंद्रायणीच्या तीरावर मृत्यूला सामोरे जाण्यापर्यंत त्यांनी दाखवलेले धैर्य व शौर्य आजही प्रेरणादायी ठरते. संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. त्यांनी मुघलांच्या आक्रमणांना प्रतिकार केला आणि छळ सहन करूनही स्वराज्य व धर्माशी तडजोड केली नाही. या त्यागामुळे त्यांना “धर्मवीर” म्हणून गौरवण्यात आले आहे.





आमदार लांडगे म्हणाले की, युवकांसाठी व्याख्यानमाला, इतिहास स्पर्धा व “धर्मवीर” आदर्शांच्या आधारे त्याग, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश प्रसारित केला जातो. सोशल मीडियावर सत्य इतिहास व सकारात्मक संदेश प्रसारित करण्यावर भर देण्यात येणार आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा महत्त्वाचा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.

“धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेच्या स्मृतीला आपण साजरे करून, युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि समाजोपयोगी भावनेची जाणीव निर्माण करू. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नसून, प्रत्येक मराठी माणसासाठी प्रेरणास्त्रोत आहे. बलिदान मास केवळ ऐतिहासिक स्मृती नाही, तर तरुण पिढीला शौर्य, त्याग व कर्तव्यपरायणतेचा मंत्र देणारा काळ आहे. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या या उपक्रमातून समाजात ऐक्य, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ होईल.यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

इतिहासाची जाणीव व राष्ट्रनिष्ठा दृढ करणे. युवकांना शौर्य, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची प्रेरणा देणे. सामाजिक ऐक्य व समाजोपयोगी कार्यांना चालना देणे, असा उद्देश आहे.

तसेच, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये अभिवादन, व्याख्यानमाला व इतिहासपर कार्यक्रम, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व अन्नदान, विद्यार्थ्यांसाठी निबंध/भाषण स्पर्धा, माहितीपर प्रदर्शने व जनजागृती मोहिमा, व्यक्तिगत आणि सामाजिक आचरण याचा समावेश आहे. दररोज महाराजांना अभिवादन व इतिहास वाचन, व्यसनमुक्त जीवनशैली, शिस्तबद्ध व सुसंस्कृत वर्तन, धर्म आणि राष्ट्राचा आदर राखणे यावर विशेष भर दिला जातो. समाजोपयोगी उपक्रमात सहभाग, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, स्थानिक ऐतिहासिक स्थळांची जतन व स्वच्छता या कामांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे...




## प्राणीशास्त्र अभ्यासकांना चिंतामणी हॉस्पिटलच्या डॉक्टर्सकडून प्रमाणपत्र वाटप

सासवड (दैनिक संध्या) : भारतातील एकमेव असणाऱ्या व ईला फाऊंडेशनचे वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या २२ व्या प्राणीशास्त्र (Ornithology)अभ्यासक्रमातील सुमारे तीस अभ्यासकांना प्रमाणपत्र देऊन त्यांच्याप्रती निसर्गप्रेम जपण्याचे स्तुत्य काम सासवडमधील दोन ज्येष्ठ डॉक्टर मंडळींनी केले आहे. चिंतामणी हॉस्पिटलचे ज्येष्ठ डॉक्टर व निसर्गप्रेमी डॉ संजय रावळ व डॉ दिलीप वाघोलीकर या दोघां डॉक्टर मंडळींनी सर्व अभ्यासकांना प्रमाणपत्र देत त्यांना निसर्ग व पर्यावरण संतुलन व प्राणीमात्रांचे संवर्धन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रमाणपत्र देण्यात आलेले तीस विद्यार्थी या अभ्यासाचा एक भाग म्हणुन पुरंदर तालुक्यातील पिंगोरी या गावात इला फाऊंडेशनच्या हॅबीटॅट येथे फील्ड ट्रिप म्हणुन आले होते त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा उपक्रम केल्याचे डॉ रावळ यांनी सांगितले. सदरच्या कार्यक्रमप्रसंगी ईला फाऊंडेशनचे डॉ सतीश पांडे, अभ्यासक्रमाचे नियोजक प्रमोद देशपांडे, सुरूची पांडे, डॉ सतीश करमळकर, डॉ राजकुमार पवार, राहुल लोणकर, श्रीकांत कुलकर्णी, वैभव गंधे, सचिन शिंदे, माऊली खोमणे, काका गायकवाड अभिराम राजंदेकर, संतोष जगताप आदी निसर्गप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.

## तरुणीचा रस्ता अडवून जबरदस्ती, मारहाण व लज्जाभंग करणारा आरोपी कारागृहात

बारामती (दैनिक संध्या) : बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या एका गंभीर व संतापजनक प्रकारात बारामती शहर पोलिसांनी तात्काळ व कठोर कारवाई करून आरोपीस अटक केली असून न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्यास येरवडा केंद्रीय कारागृहात दाखल करण्यात आले आहे. दि.14 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी देशमुख चौक परिसरात एका तरुणीचा (नाव गोपनीय – "निर्भया") रस्ता अडवून आरोपी ओंकार अशोक जाधव,रा.हरिकृपानगर, ता.बारामती याने तिची गाडी जबरदस्तीने थांबवून चावी हिसकावून घेतली व तिच्या इच्छेविरुद्ध तिला स्वतःच्या घरी नेले.तेथे तिच्यावर मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली तसेच तिच्या लज्जेस धक्का पोहोचविणारे कृत्य केले.सदर गंभीर प्रकाराची माहिती मिळताच बारामती शहर पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंद करून आरोपीस अटक केली.आरोपीस न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता त्यास प्रथम पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आली होती. पुढील सुनावणीनंतर आरोपीस न्यायालयीन कोठडी (MCR) मंजूर करण्यात आली असून त्यास येरवडा केंद्रीय कारागृहात जमा करण्यात आले आहे.या प्रकरणात भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत स्त्रीच्या लज्जेस धक्का पोहोचविणे,अपहरण करणे,मारहाण करणे व जीवे मारण्याची धमकी देणे अशा गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल आहे.बारामती शहर पोलिसांचा स्पष्ट संदेश असा आहे की,महिलांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा सहन केला जाणार नाही. सार्वजनिक ठिकाणी कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल. गुन्हेगार कोणताही असो, त्यास कायद्याच्या चौकटीत कठोर शिक्षा भोगावीच लागेल.बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत कायद्याची जरब कायम असून नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा त्रास,छळ किंवा गुन्हा झाल्यास त्वरित पोलीसांशी संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात येत आहे.सदर प्रमाणे कारवाई तपासी अंमलदार/पोलीस हवालदार श्री.उदय टापरे यांचे कडून माननीय पोलीस अधीक्षक श्री.संदीप गिल सर,अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार सर,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.श्री.सुदर्शन राठोड सर,बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



## मानवाधिकार संरक्षण संघटनेच्या कोकण विभागातील पदाधिकाऱ्यांचा सन्मान

■ कै. सौ. प्रभावती लक्ष्मण दवणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कार्यक्रम संपन्न

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : कै. सौ. प्रभावती लक्ष्मण दवणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष लक्ष्मण दवणे यांच्या सौजन्याने मानवाधिकार संरक्षण संघटनेच्या कोकण विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पद्मश्री परशुराम गंगावणे यांच्या हस्ते कोकण विभागीय अध्यक्ष संतोष नाईक यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. तसेच एकदंत फूड अँड बेव्हरेजिस (ऑरबेलो) यांच्या वतीनेही त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कोकण विभागातील (सिंधुदुर्ग-रत्नागिरी) उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हा समन्वयक प्रणय बांदिवडेकर यांनाही पद्मश्री गंगावणे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याशिवाय सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील मानवाधिकार संघटनेचे विविध पदाधिकारी — सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष सुधीर धुरी, रायगड जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ मोहिते, जिल्हा कार्याध्यक्ष मंदार काणे, जिल्हा महिला संघटक मिलन पार्ट, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय खानविलकर, कणकवली तालुकाप्रमुख मंगेश चव्हाण, मालवण तालुकाप्रमुख प्रमोद कांडरकर, मालवण तालुका सचिव राजेश कुमार लब्दे, तालुका सदस्य रोहित हडकर व कणकवली तालुका सदस्य मंगेश सावंत यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास संघटनेचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## भैरवनाथ पतसंस्थेच्या चाकण शाखेचा वर्धापन दिन दिमाखात साजरा



चाकण (दैनिक संध्या) : शिरूर लोकसभेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी स्थापन केलेल्या श्री भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्थेच्या चाकण शाखेचा तिसरा वर्धापन दिन मोठ्या दिमाखात व उत्साहात साजरा करण्यात आल्याची माहिती पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश खरमाळे व उपाध्यक्ष सागरभाऊ काजळे यांनी दिली. प्रत्येकासाठी प्रत्येकासोबत राहणाऱ्या भैरवनाथ पतसंस्थेची आढळराव पाटील यांनी मंचर जवळील लांडेवाडी येथे मुहूर्तमेढ रोवली. या पतसंस्थेचा आज अजान वृक्षासारखा मोठा वृक्ष झाला असून, ग्रामीण भागात या पतसंस्थेचा विस्तार वाढला आहे. चाकण येथील आंबेठाण चौकात भैरवनाथ पतसंस्थेची शाखा आहे. या पतसंस्थेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या वतीने श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली होती.

# दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या मातोश्रींना पुरस्कार

भिगवण (दै. संध्या)



अखिल भारतीय मराठा महासंघ व छत्रपती शिवराय सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शिवजयंती निमित्त देण्यात येणारा 'राजमाता जिजाऊ पुरस्कार' च्या मानकरी बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या मातोश्री शारदादेवी पंडितराव देशमुख ह्या ठरल्या. शिवजयंती निमित्ताने आयोजित करण्यात येत असलेल्या राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेच्या रौप्य महोत्सवातील तिसरे पुष्पप्रसंगी करमाळाच्या तहसीलदार शिल्पा ठोकडे, दौंडच्या नगराध्यक्ष कु. दुर्गादेवी जगदाळे, करमाळ्याच्या नगराध्यक्ष मोहिनीत सावंत व मराठा महासंघाच्या सर्व महिला कार्यकर्त्या यांच्या वतीने हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी शेतफळगढे येथील कृषीरत्न अर्थमूव्हर्स अँड स्टोन क्रेशरच्या रूपाली वाबळे, भिगवण येथील एच. पी. आईस फॅक्टरी च्या हेमा माडगे, समर्थ टाईल्स व मार्बलच्या सुषमा वाघ व स्वामी चिंचोली येथील पसायदान व्हेजच्या ज्योती नहाणे उपस्थित होत्या.

स्वर्गीय संतोष देशमुख यांना दुर्दैवी पद्धतीने मारण्यात आल्यामुळे त्यांचा मृत्यू संपूर्ण राज्यात वादाचा विषय ठरलेला आहे. या दुःखात संपूर्ण राज्य देशमुख परिवाराच्या पाठीमागे उभे राहिले व त्यांना न्याय देण्याचे दृष्टीने लढा उभा करण्यात आला. अशा वेळी या कुटुंबातील आधारवड ठरलेल्या सौ. शारदादेवी देशमुख यांचेतील धीरोदात्तवृत्तीची दखल घेऊन मराठा महासंघ भिगवण शाखेच्या वतीने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण प्रसंगी त्यांचे समवेत दिवंगत संतोष यांच्या पत्नी अश्विनी देशमुख व मस्साजोगच्या विद्यमान सरपंच वर्षा सोनवणे याही सोबत होत्या. हा पुरस्कार दुर्गादेवी यांनी मोठ्या धैर्याने स्वीकारला, मात्र श्रीमती अश्विनी यांना आपले दुःख लपवून ठेवता आले नाही. त्यामुळे हजारोच्या संख्येत उपस्थित असलेल्या श्रोत्यांना सुद्धा आपले अश्रू अनावर झाले. अशा या धीर-गंभीर वातावरणात पुरस्कार सोहळा संपन्न होऊन, अजूनही दुःखात असलेल्या देशमुख परिवाराला धीर देण्याचा एक आगळा-वगळा प्रयत्न महासंघाच्यावतीने करण्यात आला.

या पुरस्कार वितरणानंतर व्याख्यानमालेतील तृतीय पुष्पाचे निमित्ताने चित्रपट अभिनेत्री व निर्माती श्वेता शिंदे यांनी 'महिलांनो अबला नाही, तर सबला व्हा...!' या विषयावर उपस्थित महिलांशी संवाद साधला. याप्रसंगी छायाताई ढवळे, वर्षाताई जाधव, संगीता मोरे, सोनाली कदम, डॉ. रोहिणी निंबाळकर, डॉ. प्राची थोरात, संध्या वाघ, जयश्री मोरे, अमृता गायकवाड, दिपाली चव्हाण, पूजा धांडे, रोहिणी जगदाळे, सोनाली पवार, वैष्णवी लंगोटे, उर्मिला सूर्यवंशी, रेश्मा जाचक, जया साखरे, रोहिणी वाळके, शैला वाघ, शीला जगताप व स्मिता जाधव यांनी विचारमंचकावरील पुणे व सोलापूर जिल्हापरिषदेच्या नवनिर्वाचीत सदस्या मेघना बंडगर व वनिता गुळवे तसेच इंदापूर पंचायतीच्या नवनिर्वाचित सदस्या हेमा माडगे यांचा सत्कार व सर्व मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुचिता साळुंके, परिचय वाचन डॉ. पद्मा खरड, पुरस्कार वाचन शीतल जांबले व आभार प्रदर्शन मनिषा गलांडे यांनी केले.



## पुरंदरमध्ये 'लव्ह आजाद है' कार्यक्रमात तरुणांसोबत प्रेमाच्या मुद्द्यांवर चर्चा

पुरंदर (दै. संध्या)

विवेकी युवा मंच पुरंदरच्या वतीने प्रेम दिनानिमित्त १४ फेब्रुवारी रोजी काळुबाई कृषी केंद्र येथे 'लव्ह आजाद है..!' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम प्रेमाच्या स्वातंत्र्यावर प्रकाश टाकण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात आंतरजातीय लग्न करणाऱ्या जोडप्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यांच्या अनुभवांमधून प्रेक्षकांना प्रेमाची खरी ओळख झाली. तसेच, 'प्रेम समजून घेऊया' आणि 'प्रेमामध्ये नकाराचा स्वीकार' या विषयांवर तरुणांशी थेट संवाद साधण्यात आला. यामुळे उपस्थित तरुणांना प्रेमाच्या विविध पैलूंविषयी मार्गदर्शन मिळाले.या कार्यक्रमाचे प्रायोजक वसुंधरा द इको स्टोअर, प्रणव घोडे प्रोडक्शन आणि कन्हामाई फाउंडेशन हे होते. या कार्यक्रमाला महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम), राष्ट्रसेवा दल पुरंदर, ऋणानुबंध संस्था आणि विवेकी युवा मंचाचे कार्यकर्त्यांनी हजेरी लावली.

# जबरी चोरी प्रकरणातील आरोपी सिद्धार्थ घाडगे जेरबंद

बारामती (दै. संध्या)

■ येरवडा कारागृहात रवानगी



बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा वेगवान,शास्त्रशुद्ध आणि परिणामकारक तपास करून बारामती शहर पोलिसांनी मुख्य आरोपीस अटक करत कायद्याचा ठोस धाक निर्माण केला आहे. दि.08/02/2026 रोजी बारामती येथील शिवाजी चौक परिसरात फिर्यादीकडून मारहाण करून जबरदस्तीने रोख रक्कम काढून घेतल्या प्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. तांत्रिक विश्लेषण,स्थानिक माहिती आणि सखोल चौकशीच्या आधारे आरोपी नामे सिद्धार्थ संतोष घाडगे (वय 31 वर्षे, रा.सटवाजी नगर,इंदापूर चौक,ता. बारामती,जि.पुणे) याचा गुन्ह्यातील सक्रिय सहभाग निष्पन्न झाला.आरोपीस ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.अंगझडती दरम्यान आरोपीकडून गुन्ह्यातील रकमेपैकी काही रक्कम जप्त करण्यात आली. आरोपीस मा.न्यायालयासमोर हजर केले असता त्यास प्रथम पोलीस कोठडी मंजूर झाली.तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीस न्यायालयीन कोठडी (MCR) सुनावण्यात आली असून त्याची रवानगी येरवडा केंद्रीय कारागृह येथे करण्यात आली आहे. या प्रभावी कारवाईमुळे परिसरात कायद्याची जरब बसली असून गुन्हेगारी प्रवृत्तीला स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, कोणताही गुन्हेगार कायद्याच्या चौकटीबाहेर राहू शकत नाही.बारामती शहर पोलीस नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव सज्ज असून गुन्हेगारीवर कठोर कारवाई सुरूच राहील.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली,अपर पोलीस अधीक्षक श्री.गणेश बिरादार,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.सुदर्शन राठोड,प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या नेतृत्वात पार पडली.

तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री.रत्नदीप भंडारे तसेच स्टाफ पोलीस हवालदार सुलतान डांगे, पोलीस शिपाई विशाल चौधर,पोलीस शिपाई सागर जामदार,पोलीस शिपाई विशाल शिंदे,पुरुष शिपाई अक्षय सिताप,पोलीस हवालदार अमोल शिंदे व पोलीस शिपाई नेवसे यांनी समन्वयाने आणि तत्परतेने ही कारवाई यशस्वी केली.बारामती शहर पोलिसांच्या या कार्यक्षम कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे.नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा गुन्हेगारी प्रकार आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## समस्या सोडवून तिर्थक्षेत्राला 'विकासाचे रोल मॉडेल' बनवणार" : आ. महेश लांडगे

आळंदी (दै. संध्या)



"आळंदीकरांच्या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवून स्वच्छ, सुबक आणि विकसित आळंदी घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली श्रीक्षेत्र आळंदीत ज्ञानपीठाची पायाभरणी होत आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यकाळात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची ही पुण्यभूमी विकासाचे रोल मॉडेल ठरेल," असा ठाम विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

श्रीक्षेत्र आळंदी तीर्थक्षेत्र परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी नवनियुक्त लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक आमदार लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडली. शहरातील प्रलंबित नागरी प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. नियमित व सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी विशेष नियोजन, शहर स्वच्छतेसाठी सक्षम यंत्रणा उभारणे, बंद पथदिव्यांची तातडीने दुरुस्ती, सांडपाणी वाहिन्यांबाबतच्या तक्रारींचे त्वरित निवारण तसेच खराब रस्त्यांची डागडुजी या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. प्रलंबित विकास प्रस्तावांचा आढावा घेत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

बैठकीस नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, गटनेते सचिन गिलबिले तसेच सर्व नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले, "आळंदी शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते व प्रकाशयोजना या मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष दिले जात आहे. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करून प्रशासन अधिक जबाबदार व कार्यक्षम बनवण्यावर भर दिला जाईल. धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या आळंदीचा सर्वांगीण विकास, साधण्यासाठी नगरपरिषद प्रयत्नशील आहे."

## २१ फेब्रुवारीला सासवडमध्ये महाराष्ट्र केसरीसाठी निवड चाचणी स्पर्धा

सासवड (दै. संध्या)

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ - २६ साठी पुरंदर तालुक्यातून मल्लांची निवड चाचणी कुस्ती स्पर्धा शनिवारी (ता. २१) सासवड (ता.पुरंदर) येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या छत्रपती शिवाजी कुस्ती संकुल येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी दिली. वरीष्ठ आणि बालगटात या निवड स्पर्धा होणार आहेत. बालगटासाठी जन्म तारीख १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत असावी. वयाचा पुरावा म्हणून ओरीजन आधारकार्ड किंवा पासपोर्ट देणे बंधनकारक आहे. सहभागी होणाऱ्या मल्लांची जिल्हा कुस्तीगीर संघाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे., नसल्यास जिल्हा कुस्तीगीर संघाकडे अर्ज व रजिस्ट्रेशन फी भरून नोंदणी करता येईल., असे सचिव रविंद्रपंत जगताप यांनी सांगितले. २१ फेब्रुवारीला सकाळी ९ ते १० या वेळेत स्पर्धकांची वजने घेतली जाणार आहेत. सकाळी १० ते सायंकाळी सात पर्यंत या निवड चाचणी स्पर्धा होणार आहेत. बाल गटातील स्पर्धा गादी विभागात तर वरिष्ठ गटातील स्पर्धा गादी आणि माती विभागात वजन गटनिहाय होणार आहेत. सर्व कुस्त्या प्रेक्षणीय होणार असल्याचे रविंद्रपंत जगताप यांनी सांगितले.

## पारुंडे येथे महिलांनी घेतले मोफत शिवणकला प्रशिक्षण



जुन्नर (दै. संध्या)

डिसेंट फाउंडेशन, पुणे , हायस्पीड स्किल हब जुन्नर,मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व उपसरपंच किसन जाधव यांच्या संयुक्त विद्यमाने " मोफत शिवणकला प्रशिक्षण समारोप तसेच प्रमाणपत्र व उद्यम आधार कार्ड वाटप" हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता,त्याचा सांगता समारंभ पारुंडे येथील वेद कस्तुरी पर्यटन कृषी पर्यटन केंद्र येथे संपन्न झाला. यावेळी डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी. आतार यांच्या कडून सौ. अश्विनी कांताराम आनंदराव व सौ. अपसाना मन्सूर शेख या दोन गरजू महिलांना शिलाई मशीन चे वाटप करण्यात आले. ४० दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये महिलांना शिवणकलेचे सखोल मार्गदर्शन देण्यात आले तसेच त्यांना प्रमाणपत्र व उद्यम आधार कार्ड देण्यात येईल. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनविणे व रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा असल्याचे डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी यावेळी सांगितले.याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्र नारायणगावचे गृह विज्ञान शास्त्रज्ञ डॉ.सौ निवेदिता शेटे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज चे योगेश जोशी, हायस्पीड स्किल हबचे संस्थापक दिलीप भगत यांनी महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण व संधी याबाबत मार्गदर्शन केले.

# जुन्नरमध्ये शिवजयंती महोत्सवास सुरुवात

जुन्नर (दै. संध्या)



गुरुवार (दि.१९) रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्रीमंडळातील मान्यवरांच्या उपस्थितीत किल्ले शिवनेरीवर शिवजन्म सोहळा पार पडणार असुन,राज्य शासनाच्या पर्यटन विभागातर्फे मंगळवार दि.१७ ते गुरुवार दि.१९ फेब्रुवारी दरम्यान 'हिंदवी स्वराज्य" महोत्सव' आयोजित करण्यात असुन , यानिमित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पर्यटन विभागाचे उपसंचालक भरत लांघी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंती सोहळा यंदा नेत्रदीपक पद्धतीने साजरा करण्यात येणार असून, सर्व नागरिकांनी उत्साहाने सहभागी होऊन सोहळ्याची उंची वाढवावी, असे आवाहन जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी केले.ते शिवजयंती सोहळ्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते

शिवजन्म सोहळा सर्वांना अनुभवता यावा यासाठी शहरातील विविध ठिकाणी एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवरायांना मानवंदना देताना एक तास शिवभक्तांना किल्ल्यावर प्रवेश बंद राहणार आहे. शिवनेरी गडावर शिवजन्मोत्सवासाठी येणाऱ्या शिवभक्तांच्या स्वागतासाठी शिवनेरी मार्गावर तुळजाभवानी वेस आणि छत्रपती शिवाजी महाराज थ्री डी वेस उभारली आहे. हा महोत्सव दि.१७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिवनेरीच्या पायथ्याशी होणार असून, बैलगाडा शर्यती, तसेच खास स्टेडियम उभारून उभारून त्यामध्ये कबड्डी स्पर्धा, महिला बचत गटासाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. तसेच शिवनेरीवर छत्रपती शिवरायांच्या मुख्य अभिवादन सोहळ्याला मुख्यमंत्र्यांसह विविध खात्याचे मंत्री उपस्थित राहणार असून या वेळी शिवकालीन मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके होणार आहेत. व सायंकाळी पाच वाजता जुन्नर शहरातून भव्य शोभायात्रा, सहा वाजता शिवराजांची महाआरती आणि मनोरंजन महायात्रा आयोजिण्यात आल्या आहेत.व यादरम्यान तीन दिवस शिवभक्तांना अनुक्रमे 'अभंग रिपोस्ट', 'फोक आख्यान' आणि 'ऑल दी बेस्ट' नाटकाची मेजवानी मिळणार आहे.

शिवजयंती सोहळ्यात किल्ले शिवनेरीवर देण्यात येणारे 'शिवनेरी भूषण पुरस्कार' घोषित केले असून, यंदा शिवजन्मभूमीतील श्रुतिका ताथवडे (सबलेफ्टनंट, भारतीय नौदल), अजिंक्य मेहेर (लेफ्टनंट मद्रास रेजिमेंट), डॉ. विनोद हांडे (कॅन्सर सर्जन), शिवाजीराव खैरे (राजकीय सामाजिक योगदान) या चौघांसह दिवंगत प्रगतिशील शेतकरी पंकज वामन यांना मरणोत्तर शिवनेरी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वनाझ परिवार विद्या मंदिरमध्ये 'पडद्यामागचा सूत्रधार' कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ "भारतीय संस्कृती जपूया, नात्यामधील प्रेम वाढवूया" उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दैनिक संध्या) : वनाझ परिवार विद्या मंदिर, कोथरूड येथे १४ फेब्रुवारी रोजी 'पडद्यामागचा सूत्रधार' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनिताताई दारवटकर यांच्या संकल्पनेतून 'माझे बाबा' या भावनेवर आधारित 'बाबा दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने बाबा पालक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी पर्यावरण अभियंता व रोटरी प्रांत ३१३१ पर्यावरण विभागाचे संचालक राजेंद्र कुमार वि. सराफ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या बाबांविषयी स्वरचित कविता सादर करून त्यांच्याप्रती असलेले प्रेम व्यक्त केले. तसेच बाबांसोबतचे फोटो संग्रहित करून सुंदर मनोगतांद्वारे भावना मांडल्या. इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनींनी गीत सादर करून बाबांप्रती आदर व्यक्त केला. कार्यक्रमस्थळी आकर्षक सजावट करण्यात आली होती. बाबा पालकांचे भारतीय संस्कृतीनुसार औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर बाबा पालकांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये अनेक पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि बक्षिसेही मिळविली. अनेक पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत आपली मनोगते व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका सौ. अनिताताई दारवटकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापिका नीताताई, पर्यवेक्षिका मायाताई, कांचनताई तसेच सर्व शिक्षकांनी शिस्तबद्ध पद्धतीने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीतम दिवटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अर्चना जाधव यांनी केले. विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम आनंददायी वातावरणात यशस्वीपणे पार पडला.



### राख येथील श्रीकृष्ण सेवा ट्रस्टचे वतीने गणेश भोसले व आदींना पुरस्कार प्रदान

जेजुरी (दैनिक संध्या) : राख (ता. पुरंदर) येथील श्रीकृष्ण सेवा ट्रस्ट 111 तुळशी वृंदावन राख येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध क्षेत्रात सामाजिक काम करणाऱ्या तसेच शैक्षणिक, क्रीडाविषयक काम करणाऱ्या 11 मान्यवराणा श्रीकृष्ण सेवा पुरस्काराने उद्योजक दिलीप झेंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पुणे जिल्हा भाजपाचे सरचिटणीस गणेश भोसले यांनी गेली पंधरा वर्षात शासकीय योजना तळागाळातील महिला पर्यंत पोहचवून शेकडो महिलांना त्याचा लाभ मिळवून दिला,तसेच सर्वसामान्य नागरिकांना व्यवसाय,उद्योग वाढीसाठी योजनांचा फायदा मिळवून दिला याबद्दल त्यांना राख येथे श्रीकृष्ण सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ,पदमाकर नामदेव भोंडे, रमेश एकनाथ पवार, भगवान शेवते, , बाळासाहेब लक्ष्मण यादव, सुरसिंह रामचंद्र नागवडे, मधुकर रामचंद्र टिळेकर, बाळासाहेब गेनबा झेंडे, नितीन बाळासाहेब ससाणे, बाळासाहेब गणपत थोपटे, दिलीप पंढरीनाथ कुंभारकर, सखिया फिरोज जमादार, सुलतान फिरोज जमादार यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 111 तुळशी वृंदावन येथील महादेव मंदिरात सकाळी नऊ विवाहित जोड्यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर होम हवनाचा कार्यक्रम झाला. याचे पौराहित्य बाळासाहेब मांडके व शंकर गुरव यांनी केले. भैरवनाथ भजनी मंडळ निरा शिवतक्रार यांचा भजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर उपस्थित भक्तांसाठी माजी पोलीस निरीक्षक चंद्रकांत टिळेकर यांच्या वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम झाला अशी माहिती श्रीकृष्ण सेवा ट्रस्ट राखचे अध्यक्ष किसन महाराज चव्हाण यांनी दिली. यावेळी गणपत शितकल, गंगाराम जाधव, तुकाराम भांडवलकर, बापूराव खंडाळे, सोमनाथ चव्हाण, सुरज चव्हाण, बाळासो पांचाळ, सोमनाथ मदने, स्वराज साबळे, शेखर रणवरे, वैभव पांचाळ हे उपस्थित होते.

### स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक

मुंबई (दैनिक संध्या) : ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे ८७.५७ लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला असून राज्याच्या या यशात महावितरणची ८५.८५ लाख स्मार्ट मीटरसह प्रमुख कामगिरी आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात ऊर्जा परिवर्तन चालू आहे. सौर कृषी पंप बसविण्यासह विविध बाबतीत महाराष्ट्राने देशात ऊर्जा क्षेत्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. आता स्मार्ट मीटर बसविण्यातही महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आले आहे. शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. राज्यात ९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. स्मार्ट मीटर बसविण्याच्या बाबतीत दि. १० फेब्रुवारीपर्यंतच्या ताज्या आकडेवारीनुसार ८७.५७ लाख स्मार्ट मीटरसह महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून बिहार (८६.४४ लाख) व उत्तर प्रदेश (८२.७५ लाख) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत. विजेचा वापर कोणत्या वेळेला झाला त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला टाईम ऑफ डे (टीओडी) सवलत म्हणतात. स्मार्ट मीटरमध्ये अशा प्रकारे वेळेनुसार वीजवापर मोजण्याची सुविधा आहे व ग्राहकांनाही त्यांच्या मोबाईल फोनमधील ॲपमध्ये दर तासाला आपल्या घरात अथवा कार्यालयात किती वीज वापर होत आहे.

# घोटाळ्यामुळं महाराष्ट्राची बदनामी : खासदार सुप्रिया सुळे

नवी दिल्ली (दै. संध्या)



महाराष्ट्राच्या पोलीस आणि प्रशासनाची एक चांगली ओळख देशात होती,दुखवटा काळात झालेला अल्पसंख्यांक दर्जा घोटाळ्यामुळं महाराष्ट्राची बदनामी होत आहे.आता त्याची अशा प्रकरणांमुळं बदनामी होत आहे. हे महाराष्ट्रासाठी चांगलं नाही. मला मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे की असे प्रकार होणार नाहीत याची काळजी घ्यावी,असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.

सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या की,माणुसकी राहिली आहे की नाही. त्या मंत्रालयात दुखवटा असताना असं झालंच कसं हे खूप गंभीर आहे, शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला. याबाबत त्यांनी याची माहिती मला माध्यमातूनच मिळाली. मुख्यमंत्र्यांनी याबाबत स्टे दिला आहे असं मला कळालं आहे. हे प्रकरण माध्यमांनी उजेडात आणलं. त्यामुळं तुमचं अभिनंदन आहे. मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे याबाबत एक स्टेटमेंट द्यावं अन् हे झालंच कसं हे सांगावं अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की,आमच्या घरातील संस्कार जे झाले आहेत. माझा विश्वास आणि अपेक्षा आहे की आमच्या घरातील मुलं मुलींकडून असं कोणतंही काम करणार नाहीत आणि करू देखील नये. एवढी एक आत्या, आई आणि मावशी म्हणून आमच्या घरातील सगळ्याच मुलांकडून ही अपेक्षा आहे. असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांना पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणी देखील प्रश्न विचारण्यात आला. यावर सुप्रियाताई सुळे म्हणाल्या की,पार्थ पवार यांचे प्रकरण न्यायालयात आहे.तपास अहवाल आणि कोर्टाचा अंतिम निर्णय येईपर्यंत त्यावर बोलणं योग्य होणार नाही, न्यायालयाचं यावर काय म्हणणं आहे त्यावर आपण कसं बोलणार. या देशात कोर्टाचा निर्णय आपल्या सर्वांना मान्य करावा लागतो.असे सुप्रिया सुळे यांनी बोलताना सांगितले.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की,मुख्यमंत्री हे मंत्रालयाचे प्रमुख आहेत. मंत्री हा मंत्री असतो. त्याला पक्षात विभागू नका. ACB कारवाईचे रिपोर्टिंग कुणाला करत? तर मुख्यमंत्र्यांना करतं. मंत्रालयाच्या 6 व्या मजल्यावर बसतात. त्यांच्याकडे गृहमंत्रालय आहे. या गृहमंत्रालयानेच मंत्रालयातील तिसऱ्या,चौथ्या मजल्यावरील त्यांच्याच कॅबिनेटमधील मंत्र्याकडे एसीबी जाणं हे धक्कादायक नाही का? मग ही तक्रार केली कुणी? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याचं उत्तर दिलं पाहिजे असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की,कुणीतरी टीप ऑफ दिला ना. हा टिप ऑफ कुणी दिला. स्वतःच्याच मंत्र्याला, मंत्रालयातच कारवाई होते. म्हणजे तुम्हीच तुमच्या मंत्र्यांवर रेड करता, छापा घालता. मुख्यमंत्री ज्या वास्तूत बसतात. त्यात, त्यांच्या डोळ्यासमोर, त्याच मंत्र्यांच कार्यालय तुम्ही सील करता. हा मोठा धक्का आहे. आपल्याच घरात आपण आपल्याच माणसावर छापा घातला असा हा प्रकार आहे. टीप कुणी दिली. हे खरं आहे की खोटं आहे याची उत्तरं माझ्याकडं नाहीत,डेटा आणि वास्तव नसल्यास मी त्यावर अधिक भाष्य करणे, बोलणे योग्य नाही. पण मंत्रालयात स्वतःच्याच मंत्र्यांवर असा छापा घालणं धक्कादायक आहे. जेव्हा तुम्ही मुख्यमंत्री असता तेव्हा तुम्ही राज्याचे मुख्यमंत्री असता, पक्षाचे नसता. मंत्री हा पक्षाचा नसतो. तर तुमच्या कॅबिनेटचा असतो, असे सुप्रिया सुळे यांनी बोलताना स्पष्टपणे सांगितले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मी झिरवळांना अनेक दिवसांपासून ओळखते. छगन भुजबळ आणि नबाब मलिक जेव्हा अडचणीत आले ,तेव्हा मी त्यांच्यासोबत होते. आम्ही एकमेकांच्या सुख-दुःखात सोबत होतो,समज दिली नाही दिली याविषयी मी सांगू शकत नाही. झिरवळांसोबत मी काम केलं आहे. ते शून्यातून वर आले आहे. त्यामुळे झिरवळांबाबत जो आरोप केला जात आहे, त्याबाबत पारदर्शकपणे चौकशी व्हावी आणि मुख्यमंत्र्यांनी त्यावर स्पष्टीकरणं द्यायला हवं अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली आहे.



### श्रीमती शकुंतला छबनराव झगडे यांचे निधन

जेजुरी (दै. संध्या) : येथील श्रीमती शकुंतला छबनराव झगडे, वय-८२ यांचे वृद्धापकाळाने रविवारी (दि.१५) दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे दोन विवाहित मुले, सुना, नातवंडे ,दीर , पुतणे असा परिवार आहे . शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामभाऊ झगडे यांच्या त्या वहिनी तर सामाजिक कार्यकर्ते संतोष तात्या झगडे यांच्या त्या मातोश्री होत. रविवारी (दि.१५) सायंकाळी कैलास स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले .यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# सुरेल बंदिशी, मनमोहक चित्रांतून रंगले 'रामगान'

## अविष्कार क्रिएशन्सतर्फे आयोजन; शब्द-चित्रांच्या संयोगातून रामायणाची अनुभूती

पुणे (दै. संध्या)



विविध रागांमध्ये गुंफलेल्या बंदिशी, कलाकारांचे कर्णमधुर सादरीकरण, सुरेल बंदिशींना प्रासंगिक चित्रांची जोड यातून भारतीय शास्त्रीय संगीत, चित्रकला आणि रामायणातील अध्यात्मिक भावविश्व यांचा अनोखा संगम पुणेकरांनी अनुभवला. बंदिशकार, गायिका व चित्रकार भाग्यश्री गोडबोले यांनी रामायणातील प्रसंगांवर रचलेल्या शास्त्रीय बंदिशी व त्यांनीच साकारलेल्या चित्रांचे प्रदर्शन अशा दृकश्राव्य स्वरूपातून रसिकांनी 'रामगाना'ची रसानुभूती घेतली.

आविष्कार क्रिएशन्सतर्फे आयोजित 'रामगान' या सांगितीक मैफिलीचे नुकतेच आयोजन केले होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात रसिकांनी रामायणातील विविध प्रसंगांवर आधारित 'रामगाना'ची रसानुभूती घेतली. राम जन्मापासून ते रावणवध करून प्रभू श्रीराम अयोध्येला परतल्यानंतर त्यांचा राज्याभिषेक होईपर्यंत, वनवासावेळी माता शबरीची भेट, अहिल्या उद्धार, सीताहरण, सीतेला शोधतानाचा विरह, राम हनुमान भेट, विजयी पताका व जयघोष असे अनेक शब्दबद्ध व चित्रबद्ध केलेले प्रसंग पाहून रसिक भारावून गेले.

पं. अमोल निसळ, सावनी दातार, डॉ. सानिका गोरेगावकर, श्वेता अभिषेक, स्वानंदी सडोलीकर आणि स्वतः भाग्यश्री गोडबोले यांनी बंदिशींचे सादरीकरण केले. भटियार, केदार, मालकंस, हिंडोल, ललत, भूपेश्वरी, जौनपुरी, जनसंमोहिनी, जयजयवंती, मारवा, बिलासखानी तोडी, शुद्ध सारंग, मधुकंस, झिंझोटी, सोहोनी आणि भैरवी अशा सोळा रागांतील रचनांनी कार्यक्रमात वैविध्यपूर्ण रसोत्पत्ती निर्माण केली. खुमासदार शैलीतील सुंदर निरूपण डॉ. सुनील देवधर यांनी केले. अमित जोशी यांचे संगीत संयोजन, तर अमित जोशी, मनोज भांडवलकर, दिप्ती कुलकर्णी, प्रज्ञा देसाई आणि वसंत देव यांनी वाद्यांवर साथसंगत केली. प्रास्ताविक धनश्री करंबेळकर यांनी केले.

'रघुनंदन रूप मनोहर' या भटियार, ललत रागातील बंदिशीने मैफलीची सुरुवात झाली. केदार रागातील 'प्रकट होत खुद' ही बंदिश श्वेता अभिषेक यांनी, तर मालकंस रागातील 'कड कड कड नाद' ही बंदिश अमोल निसळ यांनी जोशपूर्ण सादर केली. वनवासाचे वर्णन करणाऱ्या हिंडोल रागातील 'राम का हो निर्वासन' व जयजयवंती रागातील 'सीताहरण की बात' बंदिशी स्वानंदी सडोलीकर यांनी सादर केल्या.'गमन करत रामलखन' या ललत रागातील भावस्पर्शी बंदिशीतून सावनी दातार यांनी वनवासाचा प्रसंग उभा केला. सानिका गोरेगावकर यांनी 'जनसंमोहिनी' या शांतरसाच्या रागात 'रामचरण स्पर्श होत', तर भूपेश्वरी रागात अमोल निसळ यांनी 'शूर्पणखा अति क्रोधित' बंदिशींतून शूर्पणखेचा संताप व्यक्त केला. सानिका गोरेगावकर यांनी 'शबरी असीम रामभक्त' ही मिश्र झिंझोटीतील बंदिश सादर केली.

**श्वेता अभिषेक यांनी सोनेरी मृगाचा सीतेचा हट्ट 'मृग प्यारासा' ह्या जौनपुरी रागातील बंदिशींतून व्यक्त केला. जयजयवंती रागातील 'सीताहरण की बात' बंदिशीतून स्वानंदी सडोलीकर यांनी जटायूवधाचा प्रसंग उभारला. 'शुद्ध सारंग' रागातील बंदिशीतून सेतूबांधणीत खारुताईचे योगदान भाग्यश्री गोडबोले यांनी छान मांडले. सावनी दातारांनी मारवा रागातील 'कटत नाही' बंदिशींतून सीतेची विरहभावना प्रकट केली. 'मधुकंस' मधील रचनेतून हनुमानाचा लंकाप्रवेश, पं.अमोल निसळ यांच्या 'सोहोनी' रागातील 'रामघोष चहू ओर' बंदिशीतून लंकेवर आक्रमण करत वानरसेनेने केलेला जयघोष असे रामायणातील विविध प्रसंग आकर्षकरित्या रसिकांसमोर उभे राहिले. 'राम सुमीर करुणाकर' या कोरस भैरवीने मैफलीची सांगता झाली.भाग्यश्री गोडबोले यांनी कल्पिलेल्या 'रामगान' या दृक-श्राव्य कार्यक्रमाला आणि त्यांच्या चित्रप्रदर्शनाला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली.**

# पुरोगामी महाराष्ट्राने केरळचा आदर्श घ्यावा : डॉ. हुलगेश चलवादी

पुणे (दै. संध्या)

विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातून राज्य सरकारने 'लाडके विद्यार्थी' योजना सुरू करून गोरगरिब, होतकरू तसेच सर्वसामान्यांसाठी उच्च शिक्षणाचे द्वार खुले करावे; असे आवाहन शिक्षण क्षेत्रातील जाणकार, बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी रविवारी (ता.१५) केले. केरळ राज्याने सरकारी, सरकारी अनुदानित कला व विज्ञान महाविद्यालयांमधील पदविका अभ्यासक्रम पुर्णत: मोफत केला आहे. याच धर्तीवर राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने सर्व शाखेतील पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित करावे, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सरकार या योजनेच्या माध्यमातून प्रोत्साहन देईल. हेच पाऊल छत्रपती-फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राची नवी दिशा ठरवेल. सरकारने एससी-एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आरटीईच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला आहे. पंरतु, केवळ आठवीपर्यंतच शिक्षण मोफत आहे. अशात गरजवंताच्या पुढील शिक्षणाची वाणवा होते. आर्थिक, मानसिक तनाव वाढत त्यांचे खच्चीकरण होतेय. क्रांतीज्योती



महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीमाईंनी पुण्यातूनच शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची मुर्हतमेढ रोवली होती. आरक्षण लागू करीत सर्वसामान्यांना शिक्षणाची कवाड उघडणाऱ्या छत्रपती शाहु महाराजांच्या विचारांचा वारसा चालवत महाराष्ट्राने सर्वांसाठी शिक्षण मोफत करावे, असे मत डॉ.चलवादींनी व्यक्त केले. राज्यात इयत्ता ९ आणि १० वी मध्ये शिक्षण सोडणाऱ्या मुलांचे प्रमाण १२.६% आणि मुलींचे प्रमाण १०.३% एवढे आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या या आकडेवारीत २०२३-२४ च्या तुलनेत १ टक्क्यांची वाढ दिसून येते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात दरवर्षी हजारो विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे पदवी शिक्षणापासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारनेही कला,विज्ञान, वाणिज्य तसेच इतर महत्वाच्या शाखांसाठी टप्प्याटप्प्याने शुल्कमाफीचा निर्णय घेतला, तर सामाजिक न्याय, शैक्षणिक समतेचे लक्ष साध्य करता येईल. शिक्षणावरचा खर्च हा भार नसून भविष्यावरची गुंतवणूक आहे, हे केरळने दाखवून दिले आहे. महाराष्ट्रानेही या निर्णयाचे अनुकरण करून विद्यार्थ्यांसाठी ठोस पाऊल उचलण्याची हीच योग्य वेळ असल्याची भावना डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली.

# मोदीविरोधात आंदोलनाच्या प्रस्तावाला काँग्रेसकडून प्रतिसाद नाही

मुंबई (दै. संध्या)

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात देशव्यापी, कायदेशीर व शांततापूर्ण आंदोलन उभारण्याच्या प्रस्तावाला काँग्रेसकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नसल्याची माहिती दिली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना पाठविलेल्या पत्राचा उल्लेख करत आंबेडकर यांनी ट्विटद्वारे ही भूमिका स्पष्ट केली. आंबेडकर यांनी आपल्या पत्रात काही गंभीर आणि चर्चेतील मुद्द्यांचा उल्लेख केला आहे. "जेफरी एपस्टाईन फाइल्स" संदर्भातील कथित ई-मेलमध्ये पंतप्रधानांचा उल्लेख झाल्याच्या वृत्तांबाबत स्पष्टीकरण देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच अमेरिकेसोबत झालेल्या आर्थिक व्यापार कराराबाबत अधिक पारदर्शकता ठेवावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. २०२० मधील चीन-भारत सीमावादादरम्यान झालेल्या संघर्षाच्या वेळी केंद्र सरकारने स्पष्ट भूमिका मांडली नाही, या मुद्द्यावरही पंतप्रधानांनी देशासमोर सविस्तर खुलासा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# आजची जागरूकता उद्याचा सशक्त समाज घडवते - डॉ. गिरीश देसाई

पिंपरी, पुणे (दै. संध्या)

■ दीर्घायुष्य साठी आरोग्याचे मापदंड पाळणे आवश्यक - पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे

■ पीसीयूमध्ये न्यूट्रीसोल कार्यक्रम संपन्न




न्यूट्रीसोल हा नाविन्यपूर्ण आणि बहुविद्याशाखीय उपक्रम आहे. यामध्ये पोषण, मानसशास्त्र, भावनिक कल्याण, सर्जनशीलता आणि अनुभवात्मक शिक्षण एकाच ठिकाणी विद्यार्थ्यांना मिळेल. पारंपारिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभाग व संवादातून या व्यासपीठावरून विचारांची देवाणघेवाण करत शिक्षण मिळेल. न्यूट्रीसोल या उपक्रमाचा विस्तार आगामी काळात चळवळ म्हणून महाराष्ट्रभर केला पाहिजे. आजारात उपचारापेक्षा प्रतिबंध अधिक प्रभावी असते. आजची जागरूकता उद्याचा सशक्त समाज घडवते असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे "न्यूट्रीसोल २०२६" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्‌घाटन पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पीसीयूचे प्र-कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे, स्कूल ऑफ सायन्सच्या अधिष्ठाता प्रा. रुचू कूथीयाला, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च प्राचार्य डॉ. दीपा नायर आदी उपस्थित होते.

यावेळी "न्यूट्रीसोल २०२६ हेल्दी लाईफ स्टाईल कॅलेंडर" चे प्रकाशन आणि स्कूल ऑफ सायन्सेस, पीसीयू आणि महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे सार्वजनिक आरोग्य, आंतरशाखीय शिक्षण आणि आरोग्य जनजागृती उपक्रमांना चालना मिळणार आहे. तसेच मानसशास्त्र व पोषण शास्त्र क्षेत्रातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्राशी प्रत्यक्ष संलग्न अनुभव संधी उपलब्ध होतील.

पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनाचे संतुलन आणि निरामय, निरोगी दीर्घायुष्य साठी आधुनिक धावपळीच्या काळामध्ये आहार आणि आरोग्याचे मापदंड पाळणे आवश्यक आहे. सर्वांगीण आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक, भावनिक संतुलन हे आपल्या जीवनशैली वर अवलंबून आहे असे पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले. प्रास्ताविक मध्ये प्रा. रुचू कूथीयाला यांनी सांगितले की, न्यूट्रीसोल २०२६ मध्ये माहितीपूर्ण व संवादात्मक आरोग्य स्टॉल्स, मानसशास्त्र व पोषणावर आधारित उपक्रम, सहभाग वाढविणारे खेळ, थेरप्यूटिक स्ट्रीट अंतर्गत मार्गदर्शन उपचार व अनुभव, आहार तपासणी व पोषण जनजागृती, संतुलित व विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यामुळे न्यूट्रीसोल २०२६ हा उपक्रम मन, शरीर आणि समाजासाठी सर्वांगीण आरोग्य साजरा करणारा उत्सव ठरला. अन्न साक्षरता, संतुलित आहार, प्रतिबंधात्मक आरोग्य, जागरूकता, मानसशास्त्र, भावनिक बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्त्व शोध, आत्मचिंतन या विषयांवर विविध उपक्रम सादर करण्यात आले. या उपक्रमास ३५०० विद्यार्थ्यांनी भेट दिली. रील मेकिंग, पोस्टर मेकिंग, प्रश्नोत्तरे, नाटक सादरीकरण या स्पर्धा घेण्यात आल्या या कार्यक्रमाला आयफिल इन्स्टिट्यूट, ब्राह्मणवाडी समुदाय तसेच अंगणवाडी आणि वृद्धाश्रमाचे प्रतिनिधी यांनी भेट दिली. पीसीयू - राहत क्लबच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला न्यूचेन्क, धांडे पॅथलॅब, इन बॉडी, पी अँड जी यांचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, व्यवस्थापन प्रतिनिधी अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे यांनी सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

